




सातारा जिल्ह्यातील एकमेव नि:पक्ष व निर्भिड दैनिक

स्थापना १९३५

# ग्रामोध्दार

सातारा || वर्ष : ९० वे || अंक : ११६ || शनिवार, दि. ०३ ऑगस्ट २०२४ || किंमत २ रुपये || RNI No. 11460/1957 www.gramoddharnews.com www.facebook.com/gramodhar पाने – ८







## सांगली, कराड, पाटणवासियांनो सावधान...!

# कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे साडेदहा फुटावर



### नदीपात्रात ५२ हजार क्युसेक्स पाण्याचा होतोय विसर्ग

### मुळगाव पुल चौथ्या दिवशी पाण्याखाली, नेरळे पुलाला पाणी धडकले

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**पाटण : कोयना पाणलोट क्षेत्रात कमी–जास्त प्रमाणात मुसळधार होत असलेल्या पावसाने कोयना धरणाची पाणी पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी धरण व्यवस्थापनाने कोयना धरणाचे सहा वक्र दरवाजे काल शुक्रवारी सकाळी ९ वाजता ९ फुटांवरून १० फुट ६ इंचावर उचलण्यात आले. यामुळे नदीपात्रात प्रतिसेकंद ५० हजार तर पायथा वीजगहातून २१०० क्युसेक्य असे एकूण ५२ हजार १०० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरु झाला आहे. यामुळे कोयना नदीच्या पात्राने काही ठिकाणी नदीपात्र सोडून प्रवाहाला सुरवात केली आहे. जुना संगमनगर धक्का पुल, मुळगाव पुल चौथ्या दिवशी पाण्याखाली असताना नेरळे पुलाला पाणी धडकून चालले आहे. पूरपरिस्थितीची पाहाणी करताना कराडचे व पाटणचे प्रभारी प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, तहसिलदार अनंत गुरव यांनी नेरळे पुलाची पाहाणी केली.**

कोयना पाणलोट क्षेत्रात पावसाचे प्रमाण वाढते राहिल्यास परिस्थिती नुसार धरणातून पाण्याचा विसर्ग करण्यात येईल असे धरण व्यवस्थापना कडून सांगण्यात आले आहे. यामुळे नदी काठावरील पाटण, कराड, सांगली शहरासह इतर गावांना सावधानतेचा इशारा धरण व्यवस्थापनाने दिला आहे. काठावर राहणाऱ्या व पुररेषेच्या जवळ राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे असे देखील सांगण्यात आले आहे.

धरण पाणलोट क्षेत्रात गुरवारी सायंकाळी ५ ते शुक्रवारी सायंकाळी ५ या २४ तासात झालेल्या पावसामध्ये कोयना येथे १३२ मि.मी. एकूण– ३८९५, नवजा येथे १५५ मि.मी. एकूण– ४५८८, महाबळेश्वर येथे १७० मि.मी. एकूण– ४२६८ ऐवढी नोंद झाली आहे. एवढ्या प्रचंड प्रमाणात पडत असलेल्या पावसामुळे धरणातील पाणी पातळी झपाट्याने वाढत असताना धरणातील पाणी साठा ८६.७८ टिएमसी, पाणी पातळी २१४८ फूट ९ इंच तर ६५४.९३९ मीटर इतकी झाली

(पान ६ पहा)



# मनू भाकर पदकांची हॅट्रीक करण्यासाठी सज्ज

## तिसरं मेडल आता एका पावलावर, फायनलमध्ये धडक

पॅरिस : पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दोन कांस्य पदक पटकावत इतिहास घडविणारी भारताची युवा नेमबाज मनू भाकर आता पदकांची हॅट्रीक करण्यासाठी सज्ज झाली आहे. तिने २५ मीटर एअर पिस्टलच्या पात्रता फेरीत दमदार कामगिरी करून अंतिम फेरीत धडक मारली आहे. पात्रता फेरीत ती ५९० गुण मिळवून दुसऱ्या स्थानी राहिली. हंगेरीची मेजर वरणिका ५९२ गुणांसह अव्वल स्थानावर राहिली. मात्र, भारताच्या इशा सिंगला अंतिम आठमध्ये स्थान मिळवता आले नाही. ती १८ व्या स्थानी राहिली. ३ ऑगस्ट (शनिवार) रोजी होणाऱ्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान निश्चित करण्यासाठी अव्वल ८ मध्ये स्थान मिळवायचे होते. जे मनूने साध्य केले आणि एकाच ऑलिम्पिकमध्ये तीन स्पर्धांची अंतिम फेरी गाठणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली.

**प्रिसिजन फेरीत तिसऱ्या स्थानी** – २५ मीटर एअर पिस्टलच्या पात्र फेरीत ४० नेमबाजांनी सहभाग नोंदवला. यात २०–२० चे दोन गट करण्यात आले होते. इशा सिंहला पहिल्या तर मनू भाकरला दुसऱ्या गटात स्थान मिळाले. पहिला इशाच्या गटाची प्रिसिजन फेरी पार पडली. ज्यात ३० शॉट्स खेळून ती २९१ गुणांसह तिस–या स्थानी राहिली. त्यानंतर मनूच्या गटाची प्रिसिजन फेरी खेळवण्यात आली. ज्यात ३० शॉट्स अखेर मनूने २९४ गुणांची कमाई केली आणि एकूण ४० जणांच्या यादीत तिसरे स्थान मिळवले. दुसऱ्या गटाच्या प्रिसिजन फेरी नंतर इशा १० व्या स्थानी घसरली.

**प्रिसिजन फेरीतील ईशाचे गुण** – इशा सिंग प्रिसिजन फेरीनंतर १० व्या स्थानावर राहिली. तिला पहिल्या राउंडमध्ये ९५, दुसऱ्या राउंडमध्ये ९६ आणि तिसऱ्या राउंडमध्ये १०० गुण मिळवले. यासह तिच्या खात्यात २९१ गुण जमा झाले.

**प्रिसिजन फेरीतील मनूचे गुण** – मनू भाकरने प्रिसिजन फेरीअखेर तिसऱ्या स्थानी राहिली. तिने पहिल्या राउंडमध्ये ९७, दुसऱ्या राउंडमध्ये ९८ आणि तिसऱ्या राउंडमध्ये ९९ गुण मिळवले. यासह तिच्या खात्यात २९४ गुण जमा झाले. रॅपीड राउंडमध्ये ईशा १५व्या स्थानीईशाने रॅपीड राउंडच्या तीन सीरिजमध्ये २९० गुण मिळवले. तिने पहिल्या सीरिजमध्ये ९७, दुसऱ्या सीरिजमध्ये ९६ आणि तिसऱ्या मालिकेत ९७ गुण मिळवले. या राउंड अखेर ती १५ व्या स्थानावर राहिली.रॅपीड राउंडमध्ये मनू दुस–या स्थानीमनूने रॅपीड राउंडच्या तीन सीरिजमध्ये ३९६ (पान ६ पहा)



# सातारा बंदला दुकानदार, व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा : रायगड तालुक्यातील उरण येथे एका तरुणीची व धारावीत (मुंबई) बजरंग दलाच्या कार्यकर्त्याची अमानुष हत्या करण्यात आली. या दोन्ही घटनांच्या निषेधार्थ शुक्रवारी विविध हिंदुत्ववादी संघटनांकडून पुकारण्यात आलेल्या सातारा बंदला दुकानदार, व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बजरंग दलाने शहरात सकाळी रॅली काढून निषेधाच्या जोरदार घोषणा दिल्या. तसेच आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही केली.**

उरण येथील यशश्री शिंदे या तरुणीची एका तरुणाकडून निर्घृण हत्या करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपीला अटकही केली आहे. दुसरी घटना धारावी येथे घडली. येथील बजरंग दलाचे कार्यकर्ते अरविंद वैश्य यांचीदेखील समाजकंटकांकडून अमानुष हत्या करण्यात आली. या धर्मांध वृत्तीच्या समाजकंटकांवर शासनाने कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाकडून शुक्रवारी सातारा बंदची हाक देण्यात आली होती. गुरुवारी सायंकाळी समाजमाध्यमावर सातारा बंदचे मेसेज प्रचंड व्हायरल झाल्याने दुकानदार, व्यापाऱ्यांमध्ये बंदबाबत चलबिचलता होती. शुक्रवारी सकाळी काही दुकानदारांकडून दुकाने बंद ठेवण्यात आली. यानंतर हळूहळू सर्वच दुकानदारांनी बंदमध्ये सहभाग नोंदविला. (पान ६ पहा)

# आ. गोरे यांच्या विरोधात याचिका करणाऱ्या दीपक देशमुख यांच्या घरी ईडी दाखल

**सातारा** : खटाव तालुक्यातील मायणी येथील मेडिकल कॉलेजच्या कोविड घोटाळ्यासंदर्भात दीपक देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या माध्यमातून आमदार जयकुमार गोरे यांच्यावर मयत लोकांच्या नावाने कोट्यावधी रुपये लाटल्याचा आरोप केला होता. या प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्र पवार) नेते आ. जयंत पाटील यांनी पावसाळी अधिवेशनात प्रश्न मांडला होता. त्यानंतर आ. जयकुमार गोरे आणि आ. जयंत पाटील यांच्यात अधिवेशनामध्ये झालेला कलगीतुरा अवघ्या राज्याने अनुभवला होता.

मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीनंतर आमदार जयकुमार गोरे यांच्या मानेवर सध्या गुन्हा दाखल होऊन अटकेची टांगती तलवार आहे. त्यादरम्यानच माण–खटाव विधानसभा मतदारसंघात ईडीचे पथक मायणी येथील देशमुखांच्या घरी आज दाखल आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेसह राजकीय, सामाजिक क्षेत्रात खळबळ माजली आहे. भाजपकडून आ. गोरे यांना वाचवण्यासाठी तर हे दबावतंत्र वापरले जात नाही ना? असा सवाल लोकांमधून उपस्थित होऊ लागला आहे.

मायणी–खटाव येथील इन्स्टिट्यूट ऑफ द मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर रुग्णालय सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी कोरोनाग्रस्तांवरील उपचारासाठी ताब्यात घेतले होते. २७ मे २०२० पासून येथे कोरोना उपचार केंद्र चालवले जात होते. संबंधित रुग्णालय आधीपासूनच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेशी संलग्न होते.

संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष जयकुमार गोरे, त्यांची पत्नी सोनिया गोरे, खजिनदार अरुण गोरे यांच्यासह राकेश मेहता, महेश बोराटे, प्रवीण औताडे, अनिल बोराटे, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. सागर खाडे या आरोपींनी मृत कोरोना रुग्णांवर उपचार तसेच कर्तव्यावर नसलेल्या डॉक्टरांच्या खोट्या सह्या, बनावट कागदपत्रांद्वारे राज्य व केंद्र सरकारच्या योजनांमधून गैरव्यवहार केल्याचे याचिकेत म्हटले आहे.

याचिकेतील विविध गंभीर आरोप महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी केलेल्या करारनाम्यात अनेक बोगस डॉक्टरांची नावे दाखवण्यात आली. ज्या डॉक्टरांनी प्रत्यक्षात (पान ६ पहा)

# पाटण तालुक्यातून लाखो मराठा जाणार सातारा येथे शांतता रॅलीला



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**पाटण : संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे–पाटील यांची १० ऑगस्ट रोजी सातारा येथे होणाऱ्या मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅलीसाठी पाटण तालुक्यातून लाखो मराठा बांधव – भगिनी जाणार असल्याचे नुकत्याच पाटण येथे झालेल्या मराठा समाजाच्या बैठकीत ठरविण्यात आले. यासाठी प्रत्येक गाव पातळीवरील मराठा बांधवांनी नियोजन करावे असे या बैठकीत ठरविण्यात आले.**

मराठा समाजाची बैठक पाटण येथे प्रा. शिक्षक सोसा. सभागृहात पार पडली. या बैठकीला तालुक्यातून मराठा बांधव उपस्थित होते. मराठा समाजाच्या पोराबाळांना हक्काचे व टिकणारे आरक्षण मिळालेच पाहिजे असे ज्यांना वाटते असे कट्टर मराठा तालुक्यातून सातारा येथे होणाऱ्या मनोज जरांगे–पाटील यांच्या शांतता रॅली साठी उपस्थित राहवे असे आवाहन यावेळी करण्यात आले आहे तर या बैठकीत झालेल्या नियोजनातशनिवार दि. १० ऑगस्ट रोजी सातारा येथे. होणाऱ्या शांतता रॅलीसाठी प्रत्येक गावातून. प्रत्येक घरातून कट्टर मराठा बांधव–

(पान ६ पहा)

**मराठा समाजाने हे ध्यानात ठेवावे..**

हक्काच्या आरक्षणासाठी व आपल्याच पोरा बाळांच्या भविष्यासाठी समाजाबरोबर रस्त्यावर उतरणे म्हणजे कोणी एका राजकीय नेत्याच्या विरोधात उतरतोय हे पहिल्यांदा डोक्यातून काढून टाका. नेत्यांच्या चार पाच पिढ्या पुढे काही न करता केवळ तुमच्यावर अधिकार गाजवत जगतील त्यांना आरक्षणाची गरज नाही. पण आपल्या पोराबाळांना आरक्षणाशिवाय पर्याय नाही.. हे लक्षात ठेवा नाहीतर आज तुम्ही नेत्याची लाळ घोटता तशी उद्या तुमची पोर नेत्यांच्या पुढच्या पिढीची लाळ घोटत बसतील. विधानसभा निवडणूका जवळ आल्या आहेत.. नेत्याची मर्जी बाळगण्यापेक्षा पोरा बाळांच्या भविष्यासाठी जातीची मर्जी बाळगा.. असे एका मराठा बांधवांने पोटतिडकीने आपली व्यथा व्यक्त करताना मराठा बांधवांना आवाहन केले.

# अस्तित्वात नसलेल्या प्रियकरासाठी दिला स्वत:चा जीव




**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कोरेगाव (संजय कदम) : वेगवान संदेश देणारी यंत्रणा, आणि मनोरंजन म्हणून शोशल मीडिया सद्या सर्वदूर पोहचला आहे यासाठी वेगवेगळे पण सहज उपलब्ध होत आहेत. मात्र या मधून होणारा क्राईम रेट ही तेवढाच वाढला आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही विशेष बाब म्हणजे इतर मीडिया प्रमाणे या मीडिया वर कोणाचे कसलेही बंधन नसल्याने हा मीडिया सद्या जीवघेणा ठरू लागला आहे त्यामुळे या मिडीयाला बंधनात ठेवण आता काळाची गरज बनली आहे.**

सध्याच्या वेगवान युगात सर्वांच्या हाती स्मार्ट फोन आलाआहे त्यामुळे याचा वापर केवळ माहिती संकलित करन एवढंच न करता त्याच्या द्वारे फेक अकाउंट्स खोलून उपद्रव माजवणारे ही खूप झाले आहेत.संवादाचं साधन म्हणून विकसित झालेल्या शोशल मीडियाने खरतर माणसात माणूस ठेवला नाही केवळ हातातील या खेळन्याने नाते संबंध दूरावले त्यामुळे हा मीडिया आता सर्वासाठी दोखेदुःखी ठरू लागला आहे.

केवळ सरळ मार्गाने नाहीतर फेक अकाऊंट काढून अनेक निष्पाप मुलांचा जीव घेण्याच काम ही या मीडिया कडून घडत आहे हे दुदैवच आहे. काही दिवसापूर्वी कोरेगाव तालुक्यातील एका २४ वर्षाच्या मुलीस अश्या फेक अकाउंट मुळे स्वतःचा जीव गमावण्याची वेळ आली ही घटना जिल्ह्यासाठी नवी नाही या पूर्वी ही अश्या घटना अनेक ठिकाणी (पान ६ पहा)

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात पावसात भिजत रास्तारोको आंदोलन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**महाबळेश्वर :** महाबळेश्वर ते मेटगुताड या दरम्यान राज्यमार्गावर मोठ मोठे खड्डे पडल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात उध्दव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने जिल्हा प्रमुख सचिन मोहीते यांच्या नेतृत्वाखाली लिंगमळा येथे मुसळधार पावसात भिजत रास्तारोको आंदोलन केले या आंदोलनामुळे महाबळेश्वर पांचगणी या राज्यमार्गावरील वाहतुक काही काळ विस्कळीत झाली होती.

एप्रिल मे महीन्यात पांचगणी ते कुंभरोशी या ३८ कि मी अंतराचे डांगरीकरणाचे काम करण्यात आले होते या पैकी महाबळेश्वर ते मेटगुताड या दरम्यानचे काम महाबळेश्वर येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहुन गेले होते व या दरम्यान रस्त्यांवर जागो जागी मोठमोठे खड्डे पडले होते या खराब रस्त्यांवरून प्रवास करणारे वाहन चालकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत होती पर्यटकां मध्ये देखिल तीव्र नाराजी व्यक्त केली जात होती या विरोधात उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेने जिल्हा प्रमुख सचिन मोहीते यांच्या नेतृत्वा खाली रास्तारोको आंदोलन करण्यात आले या वेळी माजी जिल्हाप्रमुख राजेश कुंभारदरे यशवंत घाडगे




नंदकुमार घाडगे हे देखिल उपस्थित होते आंदोलन कर्त्यांनी शिंदे सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली मिंधे सरकार हाय हाय, मिंधे सरकारचे कारायचे काय खाली मुंडीवर पाय, ५० खोके एकदम ओके, खोके सरकार मुर्दाबाद, उध्दव ठाकरे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है शिवसेना जिंदाबाद अशा घोषणा शिवसैनिकांनी दिल्या या वेळी दोन्ही बाजुला वाहनांच्या रांगा लागल्या होत्या

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय देशपांडे यांनी लिंगमळा येथे येवुन आंदोलनकर्त्याची भेट घेतली रस्त्याला पडलेले खड्डे तातडीने भरून घेतले जातील पाउस उघडताच रस्ता दुरूस्त केला जाईल सुरूर ते कुंभरोशी या राज्य मार्गासाठी ४५० कोटी रूपये मंजुर झाले आहे यातुन ज्या ज्या ठिकाणी सातत्याने रस्ते खराब होतात खड्डे पडतात त्या भागातील रस्ते सिमेंटचे केले जातील ज्या भागातील पाणी रस्त्यांवर येवुन रस्ते खराब होतात त्या सर्व भागात पाणी काढण्यासाठी गटारांची सोय करण्यात येईल असे आश्वासन या वेळी बोलताना शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख राजेश कुंभारदरे यांनी ज्या ठेकेदाराने केले आहे त्या ठेकेदारास काळया यादीत टाकावे अशी मागणी केली शिवसेनेने केलेल्या या मागणी वाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने सकारात्मक भुमिका घेतल्याने शिवसेनेने आपले आंदोलन मागे घेतले

या आंदोलनात शिवसेनेचे जिल्हा संघटक सुधीर राउत महीला जिल्हा संघटीका राजश्री भिसे सुजाता मोरे लक्ष्मी मालुसरे सातारा तालुका प्रमुख सागर रायते खंडाळा तालुका प्रमुख सागर कदम प्रणव सावंत रूपेश वंजारी हरीभाउ पवार रविंद्र भणगे महावळेश्वर शहर प्रमुख महेशभाउ गुजर शरद बावलेकर अभिषेक शिंदे आकाश साळुंखे उस्मानभाई खारखंडे राजेश पंडीत राजेश साळवी दिपक ताथवडेकर गोपाळ लालबेग जितेश कुंभारदरे शिल्पा ठक्कर वंदना बगाडे आदि मान्यवर उपस्थित्त होते

या आंदोलनात तालुक्यातून मोठा प्रतिसाद मिळाला शहरातील विविध संघटनानी यामध्ये सहभाग घेतला होता

# साताऱ्यात महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने आंदोलन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** गेले १७ वर्ष शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्या नंतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. या मागणीसाठी सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज शासकीय सेवेत असणाऱ्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले .एकच मिशन.. जुनी पेन्शन ... असा जयघोष करून पावसाच्या सरी कोसळत असताना घोषणांचा ही पाऊस पाडला .




दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर शासन सेवेत नियुक्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम १९८२ व १९८४ अंतर्गत जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्याची मागणी संघटनेद्वारे अनेकदा केली आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दीड लाख कर्मचाऱ्यांनी पेन्शन संकल्प यात्रा काढली होती. जुनी पेन्शन विधेयक नकारात्मक धोरणाचा निषेध केला होता. त्यानंतर राज्यातील १७ लाख कर्मचाऱ्यांनी मार्च. २०२३ रोजी बेमुदत संप केला होता. जुन्या पेन्शनची मागणी केली होती. सदर मागणी नंतर शासनाने समिती स्थापन करून तीन महिन्यात निर्णय घेऊ असे आश्वासित केले होते. त्यानंतर १२ डिसेंबर २०२३ ला नागपूर येथे विधानभवनावर ३ लाख कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पेन्शन जनक्रांती महामोर्चा काढण्यात आला. त्यावेळेला जुन्या पेन्शनच्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून जुने पेन्शन लागू करण्याचा पुढील आर्थिक अधिवेशनात निर्णय घेऊ. असेही आश्वासित केले होते.

जुन्या पेन्शनची समिती शिफारशीनुसार जी. पी. एस. नावाची नवीन पेन्शन योजना समितीने प्रस्तावित केली आहे. परंतु ,ही योजना फसवी असल्याचे प्रथम दर्शनी लक्षात आले आहे. त्याचाही निषेध करण्यात आला. राज्यात जुनी पेन्शन ऐवजी जी.पी.एस. किंवा अन्य कोणती योजना आणणे किंवा लागू करणे हे कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचे भविष्य उध्वस्त करणारे आहे. त्यामुळे शासनाच्या विरोधात राज्य कर्मचारी व प्राथमिक शिक्षक नाराज झालेले आहेत. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियमाप्रमाणे जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी. अशी मागणी करून अनेकांनी याबाबत वस्तूनिष्ठ व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना होणाऱ्या आर्थिक टंचाई बाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्येकांच्या गांधी टोपीवर एकच मिशन... जुनी पेन्शन.. अशी घोषणा लिहिलेली होती. यामध्ये चिमुकले सुद्धा सामील झाले होते.

सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलकांनी शांततेत आंदोलन केले . कोणत्याही प्रकारे सर्वसामान्य माणसांना अडचण येऊ दिली नाही.

वाहतुकीस अडथळा होऊ नये. याची काळजी घेतल्याबद्दल या सर्व आंदोलकांचे मनापासून पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राज्य उपाध्यक्ष रमेश अनिल उबाळे व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मोहिते तसेच व्यापारी संघटनेच्या वतीने अजित निकम, प्रशांत पवार यांनी मनापासून आभार मानले. या आंदोलनाच्या वेळेला प्राथमिक शिक्षिका रेखा कसबे, वैशाली पवार, प्रकाश कदम, रितेश गायकवाड, अविनाश करपे, अमोल जाधव, प्रवीण तरटे ,महेंद्र सावर्डेकर यांच्यासह अनेक शासकीय कर्मचारी व प्राथमिक शिक्षक उपस्थित होते. सातारा पोलिसांनी कुठेही वाहतुकीस अडथळा होऊ दिला नाही. चांगल्या पद्धतीने काम केले त्याबद्दल अनेक वाहन चालकांनी त्यांना धन्यवाद दिले.

## संक्षिप्त वार्ता

### महसूल पंधरवड्याचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते शुभारंभ



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** महसूल पंधरवडा १ ते १५ ऑगस्ट कालाधीत जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. पंधरवड्यात विविध विभागांच्या लोककल्याणकारी योजनांची जनजागृती करुन नागरिकांना प्रत्यक्ष लाभ द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात महसूल पंधरवड्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी श्री. डुडी यांच्या हस्ते झाला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण आदी उपस्थित होते.

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. शासनाच्या महत्वकांक्षी योजना गतीने राबवयाच्या असतील तर त्याची जबाबदारी महसूल विभागाकडे दिली जाते, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यासारख्या अनेक महत्त्वकांक्षी योजनांच्या अंमलबाजवणीसाठी महसूल विभाग समन्वय म्हणून काम करीत आहे. महसूल विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामांमुळे शासनाबरोबरच नागरिकांचाही महसूल विभागावर विश्वास आहे. त्यांच्या विश्वासाला पुढेही सार्थ ठरवूया.

महसूल विभागाचे काम गतीने व्हावे यासाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसीत होत आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी तंत्रज्ञान आत्मसात करुन कामात पारदर्शकता वाढवावी. नागरिकांची कामे गतीने करावी, असे सांगून महसूल दिनाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

महसूल पंधरवड्यात जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ द्यावा. सातारा जिल्हा शासनाच्या विविध योजना राबविण्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे. हा पंधरवडा राबविण्यातही अग्रेसर राहील, असे सांगून मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी महसूल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने व कराडचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांनी महसूल पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. आभार प्रदर्शन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांनी मानले. कार्यक्रमास प्रांताधिकारी, तहसीलदार व महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# श्री संत सावता माळी

संत सावता माळी (जन्म : इ.स. १२५०; समाधी : इ.स. १२९५) हे एक मराठी संतकवी होते. अरण (तालुका–माढा; जिल्हा–सोलापूर) हे सावतोबांचे गाव होय. दैवू माळी हे सावता महाराजांचे आजोबा म्हणजे वडिलांचे वडील होते. ते पंढरीचे वारकरी होते. त्यांना दोन मुले होती. पुरसोबा आणि डोंगरोबा. पुरसोबा हे धार्मिक वळणाचे होते. शेतीचा व्यवसाय सांभाळून ते भजन–पूजन करीत असत. पंढरीची वारी करीत असत. त्यांचा विवाहही त्याच पंचक्रोशीतील सदू माळी यांच्या मुलीशी झाला. या दांपत्याच्या पोटी सावतोबांचा जन्म झाला. या घराण्याचे मूळ गाव मिरज संस्थानातले औसे होय. दैवू माळी (आजोबा) अरण या गावी स्थायिक झाले.

**संत सावता माळी यांच्या बद्दल संत नामदेव म्हणतात:–**


**धन्य ते अरण, रत्नांचीच खाण। जन्मला निधान सावता तो।।**

**सावता सागर, प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरी।।**

सावता माळी यांनी भेंड गावचे भानवसे रूपमाळीफ हे घराणे असलेल्या जनाई नावाच्या मुलीशी लग्न केले. तिने उत्तम संसार केला. त्यांना विठ्ठल व नागाताई अशी दोन अपत्ये झाली. सावता माळी यांनी सेना न्हावी, नरहरी सोनार यांच्याप्रमाणेच त्यांनीही आपल्या व्यवसायातील वाक्प्रचार, शब्द अभंगांत वापरले आहेत. तत्कालीन मराठी अभंगाच्या भाषेत नव्या शब्दांची, नव्या उपमानांची त्यामुळे भर पडली. संत सावता माळी यांनी गायलेले अभंग त्यांचे समवयस्क अरणभेंडी गावातील गुरव समाजाचे संत काशीबा गुरव यांनी लिपीबद्ध केले आहेत त्या वेळी काशीबा महाराज यांनी समाजातील अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्याचे काम आपल्या अभंगाच्या माध्यमातून केले आहे व समाज जागृती करून एक चांगला समतामय समाज निर्माण करण्याचे कार्य केले आहे श्री संत सावता माळी यांच्या गायलेल्या अभंगाचे लिखाण त्यांनी आपल्या लेखणीतून लिपीबद्ध केले यावरून त्यांनी लिहिण्या वाचण्याचे ज्ञान घेतले आहे हे सिद्ध होते

अन्य माहिती

संत सावता महाराज हे संत ज्ञानेश्वरांच्या प्रभावळीतले ज्येष्ठ संत होते. यांचा काळ इ.स. १२५० ते १२९५चा आहे. (संत ज्ञानेश्वरांचा काळ इ.स. १२७५ ते १२९६ आहे.) सावफ म्हणजे खरे तर शुद्ध चारित्र्य, सज्जनपणा. सावता हा भाववाचक शब्द होय. सावपणा असा याचा अर्थ होतो. सावता महाराज लहानपणापासून विठ्ठलभक्तीमध्ये रममाण झाले. फुले, फळे, भाज्या आदी पिके काढण्याचा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता.



आमची माळियाची जात, शेत लावू बागाईतफ असे ते एका अभंगात म्हणतात.

ऐहिक जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच काया–वाचे–मने ईश्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे. न लगे सायास, न पडे संकट, नामे सोपी वाट वैकुंठाचीफ असा त्यांचा रोकडा अनुभव होता. त्यांनी जनसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. यांना केवळ ४५ वर्षांचे आयुष्य लाभले. धार्मिक प्रबोधनाचे व भक्तिप्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने जाणवतो. त्यांचे केवळ ३७ अभंग उपलब्ध आहेत. अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज अनंतात विलीन झाले. आजही पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.

अरण येथे आषाढ वद्य चतुर्दशी, शके १२१७ (दि. १२ जुलै, १२९५) रोजी संत सावता महाराज अनंतात विलीन झाले असे मानले जाते. परंतु या दिनांकाविषयी मतभेद आहेत असे कळते. कालनिर्णय दिनदर्शिकेत सावता माळी यांची पुण्यतिथी २५ जुलै (साल?) अशी दर्शवली आहे.

सावता माळी हे कर्तव्य आणि कर्म करीत राहणे हीच खरी ईश्वरसेवा अशी प्रवृत्तिमार्गी शिकवण देणारे सत आहेत. वारकरी संप्रदायातील एक श्रेष्ठ आणि ज्येष्ठ संत म्हणून त्यांचा लौकिक आहे. श्री विठ्ठल हेच त्यांचे परमदैवत होते. ते कधीही पंढरपूरला गेले नाहीत. प्रत्यक्ष पांडुरंगच त्यांना भेटावयास आले. ते कर्ममार्गी संत होते. कर्मे ईशु भजावाफहीच त्यांची वृत्ती होती. पंढरपूरच्या विठ्ठलाची पालखी वर्षातून एकदा खास त्यांना भेटावयास येत असते.

त्यांनी अध्यात्म आणि भक्ती, आत्मबोध आणि लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड घातली. धर्माचरणातील अंध:श्रद्धा, कर्मठपणा, दांभिकता व बाह्य अवडंबर याबाबत त्यांनी कोणाचीच भीडभाड ठेवली नाही. त्यावर सतत कोरडे ओढले. अन्त:शुद्धी, तत्त्वचिंतन, सदाचार, निर्भयता, नीतिमत्ता, सहिष्णुता इत्यादी गुणांची त्यांनी भलावण केली. ईश्वराला प्रसन्न करून घ्यावयाचे असेल तर योग–याग–जप–तप, तीर्थव्रत, व्रतवैकल्ये या साधनांची बिलकूल आवश्यकता नाही. केवळ ईश्वराचे अंत:करणपूर्वक चिंतन हवे आहे.

# दैनंदिन राशिभविष्य

आज शनिवार, आज दुपारी ४.३० ते ६ यावेळेत राहु काल आहे. या काळात प्रवास, प्रयाण, नविन व्यवहार, सरकारी कामे, महत्त्वाच्या गाठीभेटी इ. कामे वर्ज्य करावीत.

## आजचा दिवस


शके १९४६, क्रोधीनाम संवत्सर, आषाढ श्रावण, शनिवार, दि. ०३ ऑगस्ट २०२४, चंद्र – मीन राशीत, नक्षत्र – उत्तरा भाद्रपदा दु २ वा. ३० मि. पर्यंत नंतर रेवती, सुर्योदय– सकाळी ०६ वा. १५ मि. , सुर्यास्त– सायं. १९ वा. १५ मि.

नमस्कार आज चंद्र मीन राशीत रहाणार आहे. आजचा दिवस उत्तम दिवस आहे. आज रवि – मंगळ लाभयोग, चंद्र – गुरु लाभयोग, चंद्र – शुक्र त्रिकोणयोग व शुक्र – शनि षडाष्टकयोग होत आहे. आजचा दिवस वृषभ, मिथुन, कर्क, कन्या, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ व मीन या राशींना अनुकूल तर मेष, सिंह व तुला या राशींना प्रतिकूल जाईल.

## राशिभविष्य



गार्गी ज्योतिषालय
अ‍ॅड. सौ. स्वप्ना पवार
(बीएसएल. एलएलएम, ज्योतिष विशारद)
संभाजीनगर कमानीजवळ, ता. जि. सातारा
मो. ९८२२३०३०५४




मेष – आर्थिक व्यवहार सावधानतेने करावेत. दैनंदिन कामात अडचणी जाणवणार आहेत. मनोबल कमी राहील. काहींना आरोग्याच्या तक्रारी जाणवणार आहेत.

वृषभ – मनोबल व आत्मविश्वास वाढेल. वैवाहिक सौख्य लाभेल. कामाचा ताण कमी होईल. प्रवास सुखकर होणार आहेत. तुमचा उत्साह व उमेद वाढेल.

मिथुन –आर्थिक कामात सावधानता हवी. आरोग्य जपावे. वाहने सावकाश चालवावित. दैनंदिन कामे विलंबाने होणार आहेत. महत्त्वाचे निर्णय नकोत.

कर्क – आर्थिक कामास अनुकूलता लाभेल. दैनंदिन कामात अनुकूलता लाभेल.सन्ततिसौख्य लाभेल. मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील.

सिंह – प्रवासाचे योग येतील. मानसिक प्रसन्नता लाभणार आहे. प्रॉपर्टीची कामे मार्गी लागणार आहेत. नोकरी, व्यवसायात प्रगती होईल.

कन्या – प्रवासाचे योग येणार आहेत. काहींना अनपेक्षितपणे नातेवाईक भेटणार आहेत. चिकाटीने कार्यरत राहून अनेक कामे मार्गी लावणार आहात.

तुला – आर्थिक कामात सुयश लाभेल. मनोबल उत्तम राहील.प्रवासाचे योग येतील. कौटुंबिक स्वास्थ्य उत्तम राहील. कामाचा ताण वाढेल.

वृश्चिक – दैनंदिन कामे यशस्वी होणार आहेत. मनोबल वाढेल. उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहून अनेक कामात सुयश मिळवाल.

धनु – प्रवास शक्यतो टाळावेत. आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. दैनंदिन कामे विलंबाने होणार आहेत. मनोबल आत्मविश्वास कमी राहील.

मकर – प्रवासाचे योग येणार आहेत. आर्थिक कामात सुयश लाभेल. जुने मित्रमैत्रिणी भेटतील. कामाचा ताण असला तरी उत्साही रहाल.

कुंभ – आज आपण अत्यन्त उत्साही व आनंदी राहणार आहेत. मनोबल उत्तम राहील. नोकरी, व्यवसायात प्रगती होणार आहे. प्रवासाचे योग येणार आहेत.

मीन – गेले दोन दिवस असणारी अस्वस्थता संपणार आहे. उत्साह वाढेल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. कामे यशस्वी होणार आहेत.

# सत्ताधारी शिक्षण संपवत आहेत तर विरोधक बोलत नाहीत : अशोकराव थोरात

## शिक्षण व्यवस्था वाचवण्यासाठी बहुजनांनी पुढे यायला पाहिजे अधिवेशनात उमटला सूर...




सातारा जिल्हा शिक्षण संस्था संघाचे वार्षिक अधिवेशनात बोलताना शेतीमित्र अशोक थोरात व्यासपीठावर इतर मान्यवर

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** सातारा जिल्हा शिक्षण संस्था संघाचे वार्षिक अधिवेशन मंगळवार दि.३० जुलै २०२४ रोजी लिंब-गोवे सातारा येथे श्री कोटेश्वर शिक्षण संस्थेच्या प्रागंणात संपन्न झाले. यावेळी बोल-ताना सातारा जिल्हा शिक्षण संस्था संघाचे अध्यक्ष व राज्य शिक्षणसंस्था महामंडळाचे उपाध्यक्ष अशोकराव थोरात यांनी वरील परखड मत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाहक माजी शिक्षक आमदार विजय गव्हाणे, पुणे विभाग महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ अध्यक्ष आप्पासो बालवडकर, महाराष्ट्र राज्य प्रयोगशाळा परिचर महासंघाचे अध्यक्ष भरत जगताप, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन नलवडे, वसंतराव फाळके, अमरसिंह पाटणकर, स्वागताध्यक्ष आनंदराव ऊर्फ नंदाभाऊ जाधव मोहनराव जाधव, डी. के. जाधव, अनिरुद्ध गाढवे, एस. टी. सुकरे यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी बोलताना अशोकराव थोरात म्हणा-ले, शिक्षणातील समस्यांवर आमदारांना पत्रव्यवहार केला गेला तरी त्यापैकी कोणीही तुम्ही विषय मांडला आहे त्यावर विचार करतोय त्याबद्दल आपले आभारी आहे, असे साधे कळवायचे धारिष्ट दाखवले नाही. यावरुन त्यांची शिक्षणावरती असणारी तळमळ दिसून येते. मागील सरकारने स्वयंअर्थसहाय्यीत शाळा सुरू केल्या, तसेच ५२ हजार शिपाई पदे कमी केली. आता पवित्र पोर्टल आणून सरकारने कुटील डाव शिक्षण क्षेत्रावर टाकला पण दुर्दैवाने विरोधकांच्या अजेंड्यावर किंवा कुठल्या आमदाराचे अजेंड्यावर शिक्षण हा विषयच नाही. तो आपण आणायला सांगितले पाहिजे. गोरगरीब मुलांच्या शिक्षणाचे कसे होणार? तेव्हा कुठल्याही, आंदोलनाला बहुजनांचा पाठिंबा मिळाला तर तो यशस्वी होणार ही खूणगाठ आपण मनाशी बांधली पाहिजे.तसेच आपल्या मुलांचे नुकसान होते हे पालकांना कळल्याशिवाय किंवा गावातील लोकांपर्यंत हा विचार गेल्याशिवाय आपल्या आंदोलनाला बळ मिळणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच शिक्षणाच्या होणाऱ्या बाजारीकरणातून बहुजनांना जोडण्याचा नाही तर शिक्षणापासून तोडण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. तेव्हा सरकार ही जात व जमात एकच असून पुढे येऊन शिक्षणक्षेत्र वाचवण्यासाठी बहुजनांनी सरकारला व विरोधकांना धारेवर धरले पाहिजे असे आवाहनपर मत त्यांनी व्यक्त केले. तेव्हा ६ ऑगस्ट रोजी मुंबई येथे होणाऱ्या आंदोलनात सर्व शिक्षण संस्थांनी व समाजातील शिक्षण प्रेमी पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आ-वाहन त्यांनी यावेळी केले.

प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळाचे सरकार्यवाहक व माजी शिक्षक आमदार विजय गव्हाणे यांनी अधिवेशनात मांडलेले ठराव नमूद करताना शिक्षण व्यवस्था बरबाद करण्याचे धोरण शासनाने हाती घेत-ले असून गावातील शाळा बंद करणे, मुख्याध्यापक, कर्मचारी पदे काढून टाकणे, शिक्षकेतर सेवक कपात करणे, शाळा बंद करून आर.टी.ई धोरणांना तिलांजली देऊन गरिबांच्या मुलांना शिक्षण नाकारणे, तसेच महाराष्ट्रातील सर्व शिक्षण संस्था महामंडळाने रस्त्यावर उतरून आंदोलन करून कंत्राटी भरतीचा जी.आर रद्द केला आणि आता पुन्हा नवीन आदेश काढून महाराष्ट्रातील सत्ताधारी सरकार सहा हजार चारशे जागा कंत्राटी पद्धतीने भरू असे म्हणते याचा अर्थ सरकारला आरक्षण पद्धत बंद करून मराठा, ओबीसी, एस.सी, एस.टी तसेच गोरगरिबांना शिक्षणा-पासून वंचित ठेवायचे आहे. कारण कंत्राटी पद्धतीमध्ये कोणालाही आरक्षण मिळणार नाही यातून फक्त शिक्षणाचा व्यवहार होत असुन हा प्रश्न फक्त शिक्षणसंस्था, शिक्षक, कर्मचारी यांचा नसून शिक्षण व्यवस्थेवर होणारा हा हल्ला असून गोरगरिबांना शिक्षणा-पासून वंचित ठेवायचे आणि शिकलेल्या बेरोजगारांना नोकरीपासून वंचित ठेवायचे असा कुटिल डाव शासनाचा आहे तेव्हा समाजातील सर्व घटकांनी, बहुजनांनी शिक्षण व्यवस्था वाचवण्यासाठी पुढे आले पाहिजे असे मत व्यक्त केले.

यावेळी उपस्थितापैकी एस. टी. सुकरे, सचिन नलवडे, भरत जगताप यांचीही भाषणे झाली. सदर भाषणातून कर्मचाऱ्यांच्या व्यथा मांडत व सरकार राबवत असलेले चुकीचे धोरण याचा जोरदार विरोध केला गेला.

वार्षिक अधिवेशन यशस्वी होण्यासाठी श्री कोटेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव तुकाराम जाधव, संचालक भुजंगराव जाधव, उपाध्यक्ष नामदेवराव जाधव, प्राचार्या विभा साबळे, सर्व संचालक मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शिक्षण संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी व पालक यांची त्यांना मोलाची साथ लाभली. अधिवेशनास सातारा जिल्ह्यातील शिक्षण संस्थांचे पदाधिकारी पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज कुंभरोशी येथे संरक्षण किट व गृहपोयगी वस्तूंचे वाटप

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** श्री.रामवरदायनी बांधकाम कामगार संघटना कुंभरोशी,ता. महाबळेश्वर येथे नोंदणी कृत बांधकाम कामगारांचे संरक्षण कीट व गृह उपयोगी साहित्यांचे वाटप राजेन्द्र राजपुरे (संचालक - सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक) यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष सुरेश ह.जाधव,उपाध्यक्ष मोसिन वलगे,सचिव अजय कर्णे आदी मान्यवर उपस्थीत रा-हणार आहेत. तेव्हा साहित्य वाटपाचा कार्यक्रम दि.३ रोजी सकाळी ११|| वा. रजनंदिनी पॅलेस, कुंभरोशी येथे आयोजित करण्यात आला आहे.तेव्हा सम्बधितांनी वेळेवर उपस्थित रहावे. असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## कृष्णत सांगवे यांचे निधन



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज:** निमसोड (ता. खटाव येथिल नामवंत मल्ल कृष्णात शिवाजी सांगवे (वय :५४ ) यांचे अल्प आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, बंधू , भावजय असा परिवार आहे. परिसरातील अनेक यात्रेत ते कुस्ती पंच म्हणून काम करत होते.

# नम्रता व माणुसकीच्या बळावर निवडणुक लढणार अन् जिंकणार ही : अनिलभाऊ देसाई



येथिल कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना अनिलभाऊ देसाई, समोर उपस्थित जनसमुदाय.

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज :** आपण अनेकांना घरातील माणूस वाटतो ही आपली सर्वाधिक जमेची बाजू आहे.लोकशाहीत जनता हीच खरे राजे असते .कोणाला खुर्चीवर बसवायचे अन् कोणाला उतरावयाचे ही जनता ठरवते. दोन तपे सामाजिक जीवनात कार्यरत आहे. समोर आलेल्या पैकी ५० टक्के लोकांना नावनिशी ओळखतो. दैंनदिन जीवनात काम करताना कधीही गट, तट, पक्ष न पाहता समोर येणाऱ्याचे काम केले आहे.

माणुसकी, नम्रता निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या बळावर निवडणुकीला सामोरे जानार असून यावेळची निवडणूक जिंकण्यासाठीच लढणार आहे. असे ठोस प्रतिपादन जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिलभाऊ देसाई यांनी केले. खटाव तालुक्यातील वडूज येथिल अक्षता मंगल कार्यालयात आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते.

देसाई पुढे म्हणाले, लोकांची मने भडकावणे सोपे असते मात्र संसार उभे करणे अवघड काम असते . आपल्या हातात जी सत्ता हातात आहे. त्या माध्यमातून लोकांच्या संसारास हातभार लावण्यासाठी जाणीवपूवक प्रयत्न करत आहे.आण्णासा-हेब पाटील, वसंतराव नाईक या आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून शेकडो युवकांना स्वतः च्या पायावर उभे केले. मोठा संघर्ष करून माण तालुक्यातील कुकुडवाड गटातील १६ गावांचा पाणी प्रश्न सोडवला.

या उलट तालुक्यातील लोक प्रतिनिधींना सत्तेचा गर्व झाला आहे. सत्तेच्या माध्यमातून ते लोकांची सेवा करण्या ऐवजी त्रास देण्याचे काम केले आहे.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपण ६० ते ७० टक्के गावांचा दौरा केला आहे. पक्ष, चीन्ह नसताना स्वतःच्या हिमतीवर लोक जमतात. लोकसभा निवडणुकीत आपण महत्वाची भूमिका.. त्यावेळी अर्धे काम झाले आहे.केवळ बदल व्हावा या भावनेने थांबलो.. आपण उभे असतो तर २५ हजार मतांनी जिंकलो असतो.कार्यकर्त्यांचे हित जोपसण्यासाठी निवडणूक लढणार आहे.या खेपेस नैसर्गिक न्यायाने उमेदवारी साठी आपला हक आहे. पवार साहेबांना भेटून तुत-ारी चिन्हांची मागणी करणार आहे.महाविकास आघाडीकडून जर निर्णय चुकला तर सांगली लोकसभा निवडणुकीतील विशाल पाटील यांचे अनुकरण करत मैदानात उतरणारच असेही त्यांनी ठामपने सांगितले.

वडूज चे माजी उपनगराध्यक्ष संदीप गोडसे म्हणाले, सत्ता असो नसो सर्वसामान्य कार्यकर्त्यांना ओळख देणारा नेता आमदार झाला पाहिजे. आता भाकरी बदलण्याची वेळ आली आहे. अनिलभाऊ देसाई यांना वडूज भागातून चांगले सहकार्य मिळेल. युवानेते महेंद्र देसाई यांनी स्वागत केले.

मेळाव्यास बाजार समितीचे माजी सभापती विजयराव काळे, अनिलराव भोसले, धनाजी लवळे, सुरेश शिंदे, शिवाजी कदम, रामभाऊ जाधव, आण्णा मगर, सुखदेव पवार, जयसिंग शिंदे, नितीन नौगन,नामदेव सर, श्री. पवार, दादा निकम, संदीप शिंदे, नंदकुमार डोईफोडे, वैभव इंगळे, अनिल देशमुख, किरण देशमुख, शिदू फडतरे, सुह-ास राजमाने, श्री. काकडे सरपंच, अजित पवार, प्रभाकर देशमुख आदी सह गावोगावचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. शिवम डोंबे यांनी सूत्रसंचालन केले.

### जशाच तश्या पद्धतीने निवडणूक

देसाई यांनी भाषणात सांगितले की, कार्यकर्त्यांनी फक्त तीन महिने काम करावे. पीक केवळ पाण्यावर नाही येत नाही तर त्याला खत -माती लागते. मनी, मसल दोन्ही पॉवर चा वापर करून जशास तश्या पद्धतीने उत्तर दिले जाणार आहे.

**नमुना झेड**
**(नियम १०७ पोट नियम ११ ड (०१))**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेतल्याबाबतची जाहीर नोटीस**

श्री सदगुरू हरिवुवा महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या. फलटण शाखा दहिवडी ता. माण जि. सातारा ज्या अर्थी खाली सही केलेली वसुली अधिकारी यांनी म.स.का. १९६० कलम १५६ चे नियम १०७ दि.१९.०३.२०२२ मागणी नोटीसीने ऋणको श्री. शिंदे जितेंद्र रामचंद्र रा. खुटवाव ता. माण जि. सातारा व जामीनदार यांना देऊन नोटीसेमध्ये नमुद केलेली रक्कम ७,१४,४९८/- (अक्षरी : सात लाख चौदा हजार चारशे अठ्याण्णव रू. फक्त) व त्यावरील व्याज सदर नोटीस मिळालेल्या दिनांकापासुन ऋणको यांनी रक्कम भरणाकरणेस कसुर केली आहे. खाली सही करणा-यानी ०७.०२.२०२३ रोजी जप्तीची नोटीस दिली असुन खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरीकांना खाली निदिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणा-याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधिल नियम (१०७ (११) (ड) १) अनव्ये दिलेल्या अधिकारानुसार दि.२२.०७.२०२४ रोजी ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येते की खाली नमुद मालमत्तेसंवधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री शिंदे जितेंद्र रामचंद रा. खुटवाव ता. माण यांच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज व खर्चास अधिन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| गावाचे नाव | गटनंबर | क्षेत्र हे. आर. | मालमत्तेचे वर्णन व हिस्सा |
|---|---|---|---|
| दहिवडी ता. माण जि. सातारा | ३५८/२/१ | ५. गुंटे | कर्जदार व मालमत्ताधारक यांचा हिस्सा |

**दिनांक : २२.०७.२०२४**
**ठिकाण : दहिवडी**

**सही**
**श्री. एस. एम. भोसले**
**वसुली व विकी अधिकारी**

**सा. बां. विभाग शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२, दि. २७ सप्टेंबर २०१८**
**संक्षिप्त ई-निविदा सूचना**
**महाराष्ट्र शासन,**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**
**रेणुका पेट्रोल पंपाजवळ, पोवईनाका सातारा ४१५ ००१**

ई-मेल पत्ता- satara.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : (o2162) - 233792

**अल्पकालावधीची ई-निविदा सूचना क्र. ३१ सन २०२४-२५**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा ४१५००१, (दूरध्वनी क्रमांक २३३७९२)** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून किंवा निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करणारे व तत्सम प्रकारचे काम केलेले अनुभवी कंत्राटदार/फर्म यांचेकडून या विभागाच्या कार्यकक्षेतील खालील कामांकरीता, ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. **कामाच्या अंदाजपत्रकीय दरामध्ये जीएसटी समाविष्ठ नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुध्दा जीएसटी वगळून (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना जीएसटी देयकाच्या रकमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.**

| ई-निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | जायगाव, कण्हेरखेड, वेलंग दुधी रस्ता प्रजिमा १५९ किमी २/९०० ते ६/६०० ची सुधारणा करणे. (भाग कण्हेरखेड ते वेलंग) ता. कोरेगाव, जि. सातारा. | ५३४.३० |
| २ | कुमठे ते जळगाव रस्ता ग्रा.ना. ९० किमी ०/००० ते ४/००० ची सुधारणा करणे, ता. कोरेगाव जि. सातारा (मौजे कुमठे ते जळगाव रस्ता). | ५३४.३० |
| ३ | कोरेगाव, गोळेवाडी एकंबे वाघजाईवाडी, जायगाव, अंभेरी रस्ता प्रजिमा १६२ किमी १२/७०० ते १६/५०० ची सुधारणा करणे (भाग- अंभेरी फाटा ते प्रजिमा ३५) ता. कोरेगाव, जि. सातारा. | ५४६.०० |
| ४ | किन्हई, शेंदूरजणे रुई आझादपूर, चिमणगाव ते जरंडेश्वर साखर कारखाना प्र.जि.मा. ३३ कि.मी.१३/२०० ते १४/९०० ची सुधारणा करणे (रा.म.मा. क्र. ५४८ सी.ते जरंडेश्वर साखर कारखाना) | ५८५.०० |
| ५ | शिरंबे गायीची पिपरण गोळेवाडी ते जरंडेश्वर शुगर मिल्स रस्ता ग्रा.ना.११४ ची सुधारणा करणे. (भाग- शिरंबे व जरंडेश्वर शुगर मिल्स) ता. कोरेगाव, जि. सा-तारा. | ७०२.०० |
| ६ | रा.मा. १४० ते नांदोशी औंध पळशी निमसोड मोराळे ते रा.मा. ६० ला जोडणारा रस्ता प्रजिमा ४२, कि.मी. ००/०० ते ६/०० भाग रा.मा. १४० ते नांदोशी ते औंध ची सुधारणा करणे. ता. खटाव, जि. सातारा. | ५४६.०० |

**निविदा उपलब्ध कालावधी :-** : **दि. ०५/०८/२०२४ सकाळी १०.०० ते दि. १२.०८.२०२४** संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत

निविदा पूर्व बैठक : दि. ०८/०८/२०२४ (बैठकीचे ठिकाण - मुख्य अभियंता सा. बां. प्रादेशिक विभाग पुणे, सेंट्रल बिल्डींग पुणे) सकाळी ११.०० वाजता

**ई-निविदा उघडणे** **:- दि. १४/०८/२०२४ सकाळी ते ११.०५ ते दि. १५.०८.२०२४** संध्याकाळी १७.३० वाजेपर्यंत (शक्य झाल्यास)

खालील संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https : mahapwd.gov.in
२. https:mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा यांचे कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.लेखा/जी-११७/७७२९/२०२४**
**कार्यकारी अभियंता, सा. बा. विभाग,**
**सातारा यांचे कार्यालय**
**दिनांक : २९/०७/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा**

**आरओसी २०२४-२५/क्र.-५/C १५९६**

# गडकरींच्या गुगलीचे गारूड!

**जनमताचा कौल विरोधी जाऊ लागला की पक्षांतर्गत लोकशाही फुलू लागते. हे सर्वच पक्षांत होते आणि भाजप त्यास अपवाद कसा असेल?**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना नितीन गडकरी यांनी लिहिलेल्या पत्रातील मुद्दे अयोग्य आहेत असे एकही सज्ञान आणि सुविद्य व्यक्ती म्हणू शकणार नाही. हे पत्र आयुर्विमा आणि वैद्याकीय विमा यांच्या हप्त्यांवर आकारण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा कराबाबत आहे. सद्या:स्थितीत या दोन्हीही विम्यांवर १८ टक्के इतका सणसणीत कर आकारला जातो. गडकरी यांस नागपुरातील आयुर्विमा महामंडळाच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी या संदर्भात निवेदन दिले आणि या कराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यातील कर्मचारी हा घटक महत्त्वाचा. अशासाठी की विमा काढणारे मध्यमवर्गीय या अन्याय्य कराबाबत मिठाची गुळणी घेण्यात धन्यता मानत असताना विमा महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मात्र या कराबाबत तीव्र नाराजी नोंदवावीशी वाटली; ही बाब कौतुकास्पद. त्याहूनही अधिक कौस्तुकास्पद गडकरी यांनी या मागणीची घेतलेली दखल. त्यांनी या कर्मचाऱ्यांचे निवेदन स्वीकारताना शाब्दिक सहानुभूती व्यक्त करून हा मुद्दा सोडून दिला नाही. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांस पत्र लिहिले आणि हा कर मागे घेतला जावा, अशी मागणी केली. गडकरींचे कौतुक या मागणीसाठी. ही मागणी मान्य होणारी नाही आणि तीबाबत अर्थमंत्री असल्या तरी निर्मलाबाईदेखील काही करू शकत नाहीत, हे माहीत असतानाही त्यांनी हे पत्र लिहिले. खरे तर त्यावर निर्णय अपेक्षित असेल तर हे पत्र पंतप्रधानांनाच लिहावयास हवे, हे गडकरी यांस ठाऊक असणारच. खेरीज निर्मलाबाई या काही आपल्यासारख्या धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या नाहीत, त्या पंतप्रधानांच्या शब्दाबाहेर नाहीत, हेही गडकरी यांस ठाऊक असेलच. तरीही त्यांनी हे पत्र अर्थमंत्र्यांकडे पाठवले कारण त्यांना डावलून निर्णयासाठी हा विषय पंतप्रधानांकडे नेला असता तर निर्मलाबाईंचा अधिक्षेप झाला असता. तसे काही करण्याची गरज नव्हती. गडकरींनी अर्थमंत्र्यांकडे करकपातीची मागणी केली आणि त्याची रास्त प्रसिद्धी झाल्याने हा विषय योग्य प्रकारे चर्चेत आला. तो महत्त्वाचा असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.

आपल्या देशात अद्यापही विमा आणि आयुर्विमा यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यातही वैद्याकीय विमा– तोही वैद्यकीय उपचारांच्या खर्चाचे आव्हान पेलेल इतक्या रकमेचा– असलेल्यांची संख्या आणखी कमी. दरवर्षी भरभक्कम रक्कम खर्च करून वैद्याकीय विमा जिवंत ठेवावा लागतो. वैद्यकीय विमा घेतला आणि त्याची गरजच लागली नाहीफ असे म्हणत पैसे वाया गेल्याची तक्रार करणारे आपल्याकडे सुशिक्षितांतही सर्रास भेटतात. या विम्याच्या गरजेबाबत तितकी जागृती आपल्याकडे नाही. त्यामुळे घरातील कोणी आजारी पडले की उपचारांच्या खर्चाची रक्कम उभी करण्यात इतरांची दमछाक होते. मध्यमवर्गीयांस सरकारी रुग्णालये नकोशी असतात आणि तारांकित खासगी परवडत नाहीत. म्हणून मग ना इकडच्या ना तिकडच्या अशा कोणा रुग्णालयांत उपचारार्थ दाखल व्हावे लागते. हे असे होते कारण वैद्याकीय विम्याचा अभाव. त्यात आपल्या देशात इंग्लंडप्रमाणे उपचारांची हमी देणारी राष्ट्रीय आरोग्य सेवाही नाही. परिणामी अशा आजारी व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या हालास पारावर राहात नाही. अशा परिस्थितीत निदान वैद्याकीय विमा तरी अधिकाधिक लोकप्रिय कसा होईल यासाठी प्रयत्नांची गरज असताना या विम्याच्या वार्षिक वर्गणीवर १८ टक्के इतका सणसणीत कर आपल्याकडे आकारला जातो. त्याची वसुली केली जाते अर्थातच विमा खरेदी करणाऱ्या ग्राहकांकडून. म्हणजे दंडावर भुर्दंड म्हणायचा.

अशावेळी किमानपक्षी वैद्याकीय विम्यावरील वस्तू–सेवा कर रद्द अथवा कमीत कमी कसा आकारला जाईल हे पाहणे अर्थमंत्र्यांचे कर्तव्य होते. पण बकासुराप्रमाणे महसुलासाठी बारा महिने चोवीस तास हपापलेले सरकार या आयत्या उत्पन्नावर कसे काय पाणी सोडणार? वैद्याकीय विम्यावर इतका वस्तू–सेवा कर आकारणे म्हणजे जगण्यातील अस्थैर्यालाच कराच्या जाळ्यात आणणे, असे ही कर हटवा मागणी करणारे म्हणतात. त्यात निश्चित तथ्य आहे. कर हा व्यक्तीच्या उत्पन्नावर असतो. म्हणजे एखाद्याने जी काही कमाई केली ती करपात्र असते वा नसते. पण जगण्यातील अस्थिरता ही काही कोणाची स्वकर्तृत्वाने केलेली कमाई नाही. एखादा स्वत:च्या बेजबाबदारपणामुळे स्वत: पुरती अस्थिरता ओढवून घेतो ती बाब वेगळी. पण हे विधान सरसकटपणे करता येत नाही. अशावेळी आयुष्यातील अस्थिरतेस काही स्थिर आधार देण्याचा प्रयत्न म्हणून एखाद्याने आयुर्विमा वा वैद्याकीय विमा काढला तर असे करणाऱ्यास खरे तर व्यवस्थेने प्रोत्साहन द्यायला हवे. कारण स्वत:ची व्यवस्था स्वत: करू शकणाऱ्या व्यक्तीमुळे सरकारची होणारी बचत ही अन्य गरजूंच्या मदतीसाठी वापरता येऊ शकते. म्हणजेच त्यांना यासाठी अधिक करसवलत द्यायला हवी. ते राहिले बाजूलाच. उलट असे करू पाहणाऱ्यांवर सरकार १८ टक्के इतके करभार आकारणार; यात कोणते शहाणपण? यास आणखी एक बाजू आहे. ती अशी की आयुर्विमा, वैद्यकीय विमा यांवर केलेला खर्च हा आयकर– मुक्त असे. ही सोय जुन्या आयकर प्रणालीत होती. तिचा फायदा घेण्यासाठी का असेना आयुर्विमादी बाबींत गुंतवणूक केली जात असे. तथापि नव्या कर प्रणालीत अशा सर्व सुविधा काढून घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे कर वाचवण्यासाठी गुंतवणूक करण्याची काही सोयच मध्यमवर्गीयांस राहिलेली नाही. अशावेळी विमा कर्मचाऱ्यांची संघटना कर वाढीविरोधात आवाज उठवून ही करसवलत पुन्हा द्या अशी मागणी करत असेल तर ती अत्यंत स्तुत्यच ठरते. आणि अशा मागणीस नितीन गडकरी हे पाठिंबा देत असतील तर तो अधिकच लक्षणीय ठरतो. या अधिकचचे कारण हे अर्थकारणात नाही. राजकारणात आहे.

ही करवाढ केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे आणि त्याच केंद्र सरकारात नितीन गडकरी हे महत्त्वाच्या खात्याचे मंत्री आहेत. आपल्याच एका सहकारी मंत्र्याच्या खात्यासंदर्भातील मागणीस त्यांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. आणि ही घटना विद्यामान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ताज्या निवडणुकीत भाजपस अपेक्षित यश मिळवून देण्यात अपयश आल्यानंतर घडलेली आहे. ही यातील अत्यंत कळीची बाब. मोदी आपला चारसो पारचा नारा खरा करू शकले असते तर एखादी व्यक्ती परमेश्वर होऊ शकत नाही वगैरे विधाने ज्या प्रमाणे केली गेली, तशी ती कुणी केली असती किंवा काय असा प्रश्न उपस्थित होतो; त्या प्रमाणे स्वत: सहभागी असलेल्या सरकारच्या करप्रणाली विरोधातील मतास केंद्रीय मंत्र्यांकडूनच असा पाठिंबा मिळाला असता काय, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. गडकरी यांची ही कृती आणखीही काहींच्या अशा संभाव्य कृतीस दिशादर्शक असू शकते, हे सत्यही या निमित्ताने विचारात घेणे इष्ट. जनमताचा कौल विरोधी जाऊ लागला की पक्षांतर्गत लोकशाही फुलू लागते. हे सर्वच पक्षांत होते आणि भाजप त्यास अपवाद असेल असे मानायचे काहीही कारण नाही. आज गडकरी बोलले. उद्या योगी आदित्यनाथ वा आणखी कोणी अशी मागणी करेल. सत्तेस पाठिंबा देणाऱ्या चंद्राबाबू नायडू वा नितीश कुमारांपैकी कोणी अशा मागण्यांस पाठिंबा देऊ शकतात. स्वत:च्याच सरकारवर गडकरींनी अशा तऱ्हेने गुगली टाकलेली आहे. तिचे गारूड काहींस मोहवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# स्वातंत्र्यसंग्रामातील प्रतिसरकारकर्ते क्रांतिसिंह नाना पाटील

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यात ब्रिटीश सत्तेला सळो की पळो करून सोडणारे महाराष्ट्रातील थोर क्रांतिकारक क्रांतिसिंह नाना पाटील हे स्वातंत्र्यपूर्व काळातील भूमिगत कार्यकर्ते आणि स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी राजकारणी होते. प्रामुख्याने सांगली आणि सातारा या परिसरामध्ये कार्यरत असलेले नाना यांच्यावर सुरुवातीच्या काळात सत्यशोधक विचारांचा प्रभाव होता. पुढे ब्रिटिशांच्या अन्यायकारक राजवटीस आव्हान देण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक मार्गाचा पुरस्कार केला. साताऱ्यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत त्यांचा मोलाचा वाटा होता. आज ३ ऑगस्ट २०२४ क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती. या दिनाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनचरित्राचा घेतलेला वेध.........**



नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येडे मच्छिंद्र या छोट्याश्या गावी शेतकरी कुटुंबात झाला. लहानपणापासूनच नानांची दणकट शरीरयष्टी आणि भारदस्त व्यक्तिमत्वामुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत असत. आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नानांनी काही काळ तलाठी म्हणून नोकरी केली. पण समाजकारण व राजकारणाची ओढ असलेले नाना त्यात रमले नाहीत. सन १९३०च्या सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेऊन त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आपला सहभाग नोंदविला. स्वातंत्र्यलढा आणि बहुजन समाजाच्या विकासाचा ध्यास घेत तेथून पुढे जवळपास ४६ वर्षे ते सक्रीय समाजकारणात आणि राजकारणात राहिले. ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यांना धाडसी बनवण्याचा प्रयत्न केला. लोकांना त्यांच्याच ग्रामीण भाषेत प्रभावी भाषणे करून त्यांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून त्यांनी घेतले. नानांच्यावर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता.

नानांनी ग्रामराज्याची स्थापना करण्याचे कार्य हाती घेतले होते. खेड्यातील परकी सत्ता नामशेष करून त्यांना स्वयंपूर्ण बनवावे व त्यांचा सर्व कारभार ग्रामस्थांच्या हाती द्यावा, अशी त्यांची ग्रामराज्याची कल्पना होती. लोकनियुक्त पंचांनी खेड्याचा कारभार पहावा व आवश्यक वाटल्यास भूमिगतांनी त्यांना मदत करावी अशी एकूण ग्रामराज्याची कार्यपद्धती होती. कराड, वाळवे, तासगाव इ. ठिकाणी पंचसभा स्थापन करून त्याव्दारे न्यायदान समित्याही स्थापन करण्यात आल्या. कोरेगाव, पाटण, सातारा इ, गावी, वर्षानुवर्षे बेकायदेशीरपणे गाळली जाणारी हातभट्टीची दारू चार महिन्यांत क्रांतिकारकांनी बंद केली.१९२० ते १९४२ या काळात नाना दहा वेळा तुरुंगात गेले.

नाना पाटील यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा व राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रभाव होता. त्यांनी मगांधी –विवाहफ ही अतिशय कमी खर्चात विवाह करण्याची पद्धत रुजवण्याचा प्रयत्न केला, तसेच शिक्षण प्रसार, ग्रंथालयांची स्थापना, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. त्यांच्यामुळे शाहीर निकम, नागनाथअण्णा नायकवडी यांसारखे कार्यकर्ते घडले.

महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीच्या भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये नाना पाटलांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. नाना पाटील यांनी साताऱ्यामध्ये भूमिगत चळवळीच्या माध्यमातून प्रतिसरकारची स्थापना करून महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीला महत्वपूर्ण योगदान दिले. प्रतिसरकारची स्थापना झाल्यावर इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान निर्माण केल्याने लोकसहभाग वाढून ग्रामीण भागात ब्रिटिशांचे अस्तित्व संपुष्टात आले. या काळामध्ये महाराष्ट्रातील सातारा, सांगली या परिसरात नाना पाटलांची ब्रिटिशांवर एक मोठी भीती निर्माण झाली होती. ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे या विचारातून त्यांनी प्रतीसरकारची स्थापना करून इ.स. १९४२च्या चलेजाव चळवळीत त्यांनी हे प्रत्यक्ष अंमलात आणले. त्यामुळे या काळात नाना पाटील हे प्रतिसरकार अथवा मपत्री सरकारफ म्हणून ओळखले गेले.

या प्रतिसरकारच्या माध्यमातून लोकन्यायालये, अन्नधान्य पुरवठा, बाजारव्यवस्था, सावकरांना शिक्षा, तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथा व चालीरीती यांचे निर्मुलन यासारखी लोकोपयोगी कामे केली जात. प्रतिसरकारचा प्रचार कवी ग. दि. माडगुळकर यांच्या पोवाड्यांच्या माध्यमातून आणि शाहीर निकम यांच्या खड्या आवाजाद्वारे केला जात होता. नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारमध्ये विविध दलांची स्थापना होऊन त्यातल्या एका तुफान दलाचे नेतृत्व फील्ड मार्शल जी.डी. लाड (बापू) आणि कॅप्टन आकाराम (दादा) पवार यांच्याकडे आले. यांच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या रेल्वे, पोस्ट आदी सेवांवर हल्ला करून त्यांना नामोहरम करण्याचे तंत्रही नाना पाटील यांनी यशस्वीरीत्या राबवले. कुंडल या ठिकाणी असलेल्या सुसज्ज युद्धशाळेतून प्रशिक्षित पाच हजारांवर जवानांच्या दोनशे शाखा स्वातंत्र्यपूर्व काळात गावोगाव काम करीत असत. तलवारी, जांबिया या हत्याराबरोबरच पिस्तूल व बाँबगोळे फेकण्याचे प्रशिक्षण या जवानांना दिले जात होते. यामुळे इंग्रजांच्या बरोबरच गावटग्यांवर दहशत बसून पत्री सरकार अशी ओळख तयार झाली.

१९४२ ते ४६ या काळात ते भूमिगतच होते. ब्रिटिशांनी त्यांना पकडण्यासाठी दहा हजारांचे बक्षीस लावले होते पण ते ब्रिटिशांना सापडले नाहीत. ते भूमिगत असताना ब्रिटिशांनी त्यांच्या घरावर जप्ती आणली, त्यांची जमीनही सरकारजमा केली. याच काळात त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. यावेळी क्रांतिसिंहांनी आपला जीव धोक्यात घालून, धावपळीत मातोश्रींवर अंत्यसंस्कार केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे नक्की झाल्यावरच (१९४६) क्रांतिसिंह कऱ्हाड तालुक्यात प्रकट झाले.

काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर (१९४६) त्यांच्यावरील पकड वॉरंट रद्द करण्यात आले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नाना पाटलांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातही भाग घेतला. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी काँग्रेस पक्ष सोडून शेतकरी कामगार पक्षात गेले. त्यांनी शेतकरी कामगार पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष या पक्षांच्या माध्यमातून समाजसेवेचे कार्य केले. सन १९५७ मध्ये ते उत्तर सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. २६ मे १९६६ साली मुंबईच्या शिवाजी पार्कमध्ये भरलेल्या सभेत आचार्य अत्रे यांनी क्रांतिकारक नाना पाटील यांना ङ्गक्रांतीसिंहफही पदवी बहाल केली. सन १९६७ मध्ये कम्युनिस्ट पक्षाचे उमेदवार म्हणून ते बीड मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. संसदेत मराठीतून भाषण करणारे ते पहिले खासदार होते. यादरम्यान त्यांनी भारतीय सांस्कृतिक मंडळातून रशियाचा दौरा केला. सध्या खानापूर तालुक्यातील हणमंतवडिये येथे क्रांतिसिंहांची मुलगी हौशाक्का व नातू सुभाष पाटील हे राहतात. अशा या स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून संपूर्ण महाराष्ट्रात एक कार्यायात असलेल्या प्रेरणादायी व्यक्तिमत्वाचा व झुंझार देशभक्त असणाऱ्या क्रांतिसिंहांचे ६ डिसेंबर १९७६ मध्ये वाळवा या ठिकाणी निधन झाले. त्यांच्या पवित्र स्मृतीला या जयंतीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

**– सहा प्रा.सुर्यकांत शामराव अदाटे**
**प्रा.संभाजीराव कदम हाविदयालय, देऊर**
**मो.नं. ९९७५७५९३२५**

# कोस्टल मॅरेथॉनसारखाच कोकण पर्यटन

गतवर्ष प्रमाणेच याही वर्षी रत्नागिरीमध्ये एक उत्तम उपक्रम आयोजित केला जात आहे. कोकण कोस्टल मॅरेथॉनचे (लेरींींरश्र ारींींहेप) दि. ७ जानेवारीला रत्नागिरी शहरात आयोजन करण्यात आले असुन रत्नागिरी ही धावनगरी होत आहे. या मॅरेथॉनमध्ये रत्नागिरीसह सिंधुदुर्ग, रायगड तसेच उर्वरित महाराष्ट्रातून प्रसिद्ध धावपटू सहभागी होत आहेत. क्रीडा उपक्रमाच्या माध्यमातून कोकणातील पर्यटन एक्सप्लोअर करण्याचा आयोजकांचा एक उत्तम प्रयत्न आहे.

गतवर्षी २०२३ चया पहिल्या आठवड्यात रत्नागिरीत पहिल्या सायकल संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने राज्यातील वेगवेगळ्या भागांतील सायकलपटू कोकणात, रत्नागिरीत आले होते. रत्नागिरीत हा पहिला उपक्रम होता. या उपक्रमाची खूपच चर्चा झाली. आत्ता हेच सायकलपटू कोस्टल मॅरेथॉनमध्ये सुद्धा आहेत. खूप मोठ्या उत्साहाने कोस्टल मॅरेथॉनची तयारी करण्यात आली आहे. अत्यंत उच्चप्रतीच्या, प्रोफेशनल पातळीवर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत ५, १० आणि २१ किमी (हाफ मॅरेथॉन) या स्पर्धेकरिता जवळपास १५०० जणांनी नोंदणी केली आहे. विशेष म्हणजे यामध्ये ४० टक्के धावदूत हे महाराष्ट्र व देशभरातील आहेत. पर्यटन, रत्नागिरी डेस्टिनेशन व्हावे या सुहेतूने मॅरेथॉन प्रभावशाली होण्याकरिता चोख नियोजन करण्यात आले आहे. सुवर्णसूर्य फाऊंडेशनच्या माध्यमातून या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले असताना स्थानिक पातळीवर अनेक हात मदतीला पुढे आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालय, उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत, बँक ऑफ इंडिया, रत्नागिरी सायकलिस्ट क्लब, ब्रूक्स, रत्नागिरी हॉटेल असोसिएशन, एमआर असोसिएशन आदींचे योगदान लाभत आहे.

आयोजकांनी डिसेंबर २०२२ पासून ही मॅरेथॉन करण्यासाठी मेहनत घेण्यास सुरुवात केली होती. त्याकरिता राज्यभरातील १२ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये आयोजकांनी भाग घेऊन तिथल्या नियोजनाची माहिती घेतली आहे. त्यानुसार रत्नागिरीत नियोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉनसाठी बाहेरगावाहून धावपटू रत्नागिरीत येत आहेत. त्यानिमित्ताने रत्नागिरीतील सर्व हॉटेल्स आरक्षित केलेली आहेत. भाट्ये येथे स्पर्धकांना परत नेण्याकरिता रिक्षाचालक संघटनेशी चर्चा झाली असून, त्या माध्यमातूनही रिक्षाचालकांना फायदा होणार आहे. बोर्डिंग रोड येथील तारांगण येथे शनिवारी (दि. ६ जानेवारी) सकाळी १० ते ६ या वेळेत स्पर्धकांना बिब (नंबर) देण्यात येणार आहे. सर्व विजेत्यांना मिळून साधारण २ लाखांहून अधिक रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येकाला आंब्याच्या आकारातील मेडल मिळणार आहे.


ही स्पर्धा ऐतिहासिक थिबा पॅलेस रोडवरील हॉटेल मथुरा येथून ७ जानेवारी रोजी सुरू होईल. २१ किलोमीटरसाठी सकाळी ६ वाजता झेंडा दाखविण्यात येईल. धावपटू हे नाचणे, काजरघाटी, सोमेश्वर, वेसुर्ले, कोळंबे, फणसोप येथून धावत भाट्ये येथे समारोप होईल. १० किमीसाठी स. ६.१५ वाजता झेंडा दाखवून सुरुवात होईल. नाचणे, शांतीनगर व वळसा मारून मारुती मंदिरमार्गे भाट्ये येथे पोहोचतील. ५ किमीची स्पर्धेस स. ६.५० वाजता सुरुवात होईल. म

ारुती मंदिर, नाचणे पॉवर हाऊस येथून वळून पुन्हा त्याच मार्गाने भाट्यापर्यंत स्पर्धक येतील. या धावमार्गांवरील सर्वच गावांना त्यांचा इतिहास, संस्कृती आहे, वैशिष्ट्य आहे. ही गावे त्यानिमित्ताने एक्सप्लोअर होतं आहेत.

या स्पर्धेत कोकण वगळता अन्य भागांतील धावपटू सहभागी होणार असल्याने रत्नागिरीची चर्चा सर्वदूर होणार आहे. येथील पर्यटन विकासासाठी ही सर्वात मोठी गोष्ट ठरणार आहे.

# भगवंताशी एकरूप झाल्यावर सर्व आनंदच आहे.

भक्त झाल्यावर माणूस ज्या आनंदात असतो तो आनंद वर्णन करून समजणार नाही. जिथे दु:खच नाही तिथे आनंद हा शब्द तरी सांगायला कोण असणार ? अनन्य भक्त व्हावे आणि तो आनंद पहावा. भक्ताला सर्वच ठिकाणी आपण आहोत असे दिसते; म्हणजे सर्व चराचर वस्तू तो भगवद्रूपच पहात असतो. एखाद्या खोलीत सर्व बाजूंनी आरसे ठेवलेले असले, तर कुठेही पाहिले तर आपल्याला काय दिसेल ? आपल्या स्वत:शिवाय दुसरे काहीच दिसणार नाही. म्हणजे, सर्व ठिकाणी एकभाव झाला तिथे दु:खाचे कारणच नाही. तिथे सर्वच आनंद असतो. त्याप्रमाणे, भक्त भगवंताशी एकरूप झाला तिथे आनंदाशिवाय दुसरे काय असणार ? जे याप्रमाणे जगात वावरतात, ते आपल्या आनंदात राहूनही इतर लोकांप्रमाणे वागत असतात. तुकारामांनी अशा स्थितीत राहून लोकांना सन्मार्ग दाखविला. समर्थांनीही ती स्थिती सांभाळून सर्व जगाचा व्यवहार केला आणि इतर लोकांना आपल्या पदाला नेले. आपण कधी त्या आनंदाकडे जाण्याचा मार्ग पाहिलेला नाही. म्हणून, ज्यांनी तो आनंद पाहिला आहे आणि जे सदैव त्या आनंदातच रहातात, त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे; म्हणजेच



**महाराज म्हणतात**

गुरुआज्ञेप्रमाणे वागावे. आपल्याला वाटाड्या भेटला म्हणजे त्याच्यावर विश्वास ठेवून आपण चालतो, त्याप्रमाणे गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून आपण वागावे म्हणजे आपले हित होते.

एखाद्या आंधळ्या माणसाने साखर समजून जर मीठ खाल्ले, तर ते खारट लागल्यावाचून राहणार नाही. त्याप्रमाणे, आनंद मिळेल या कल्पनेने आपण विषयाची संगत धरली, पण त्यापासून दु:खच प्राप्त झाले. पुष्कळ वस्तू मिळाल्या तर त्याने पुष्कळ सुख मिळते असे मानणे हा भ्रम आहे. खरे किंवा पुष्कळ सुख म्हणजे कायमचे, सनातन सुख होय. ते सनातन वस्तूपाशीच, म्हणजे भगवंतापाशीच असते. भगवंताचे आपण झाल्यास सुखी होऊ. तोंड गोड करण्यासाठी जशी साखर खावी लागते, तसे आनंद प्राप्त होण्यासाठी नाम घ्यावे लागते. आपण प्रपंच दुसऱ्याचाच करतो, आपला करीतच नाही. एखाद्या शेतापेक्षा कुंपणालाच जास्त खर्च यावा, त्याप्रमाणे आपण आपल्या मूळ स्वरूपापेक्षा आपल्या उपाधींचीच जास्त आरास करतो. आपण सर्व मिळवतो, पण सर्व ठेवून जावे लागते. आपल्या फायद्याचे केले तरच आपला प्रपंच ; भगवंताचे स्मरण तेवढाच आपला प्रपंच. आपण आईबापांवर, नवराबायकोवर, मुलांवर, नातेवाइकांवर, शेजाऱ्यापाजाऱ्यांवर सुखासाठी अवलंबून राहिलो तर सुखी होणार नाही. आपले दु:ख किंवा यातना जर कोणी नाहीशा करीत नाही तर मग दुसरा कोणी आपल्याला सुख देईल ही कल्पना कशी खरी ठरेल ?

दैनिक ग्रामोद्धार हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक धनंजय रा. जाधव यांनी अजित ऑफसेट प्रिंटर्स १६८ अ रविवार पेठ, पोवई नाका, सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक ग्रामोद्धार कार्यालय २२८ रविवार पेठ, पोवई नाका सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संस्थापक, संपादक – स्व. रामचंद्र बा. उर्फ भाऊसाहेब जाधव, संपादक – धनंजय रा. उर्फ बापूसाहेब जाधव, कार्यकारी संपादक – अजितसिंह रा. जाधव, व्यवस्थापकीय संपादक चंद्रसेन जाधव. फोन नं. : (०२१६२)२३४२३२, २३८५१४, फॅक्स – २३८६६९. फलटण विभागीय कार्यालय : सागर अपार्टमेंट, डेक्कन चौक, लक्ष्मीनगर, फलटण. मोबा : ९९६०९१००२० Email-gramodharstr@gmail.com या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद– विवाद सातारा न्यायकक्षेत.

# ना. महेश शिंदे यांचे दातृत्व; कोरेगावकरांच्या २४ बाय ७ पाणी योजनेसाठी कृष्णा नदी काठची स्वमालकीची जागा नगरपंचायतीला दिली मोफत

## सी. एन. देशपांडे यांना एस.टी.ए.आय.कडून सुवर्णपदक प्रदान




**दि शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्यावतीने मान्यवरांच्या उपस्थितीत इस्जेक सुवर्णपदक सन्मान स्वीकारताना सी. एन. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. तनुजा देशपांडे.**

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** रेठरे बुद्रुक (ता. कराड) येथील य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर व जयवंत शुगर्सचे प्रेसिडेंट सी. एन. देशपांडे यांना दि शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्यावतीने प्रक्रिया अभियांत्रिकीसाठी मइस्जेक सुवर्णपदकफ प्रदान करण्यात आले. जयपूर येथे हा सोहळा पार पडला.

साखर उद्योगाच्या विकासात दिलेल्या अमूल्य योगदानाची दखल घेत, सी. एन. देशपांडे यांना प्रक्रिया अभियांत्रिकीसाठी मइस्जेक गोल्ड मेडलफ हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. जयपूर येथे ३० जुलै रोजी झालेल्या दि शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन ऑफ इंडियाच्या ८२ व्या वार्षिक अधिवेशनामध्ये वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे मुख्य सल्लागार शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते श्री. देशपांडे यांना हे सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. पुरस्कार सोहळ्यात सी. एन. देशपांडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. तनुजा देशपांडे यांनी हा सन्मान स्वीकारला. या सन्मानाबद्दल कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले, व्हाईस चेअरमन जगदीश जगताप व संचालक मंडळाने श्री. देशपांडे यांचे अभिनंदन केले.

या सोहळ्यास निराणी ग्रुपचे संगमेश निराणी, शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष संजय अवस्थी, व्ही.एस.आय.चे महासंचालक संभाजी कडू-पाटील, एन.एस.आय.च्या संचालिका डॉ. सीमा परोहा, आय.आय.एस.टी.चे संचालक आर. विश्वनाथन, याडु कॉर्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक कुणाल यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कोरेगाव :** कोरेगाव शहरासाठी केंद्र सरकारच्या महत्त्वपूर्ण अमृत दोन अंतर्गत २४ बाय ७ पाणी योजना मंजूर झाली असून, त्यासाठी तब्बल ६७ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी आपल्या मालकीची कृष्णा नदीकाठी असलेली जागा मोफत देऊ केली आहे. या जागेवर या योजनेचे नवीन पंप हाऊस व जॅकवेल उभारले जाणार आहे. गुरुवारी दुपारी दोन वाजता कोरेगावच्या दुय्यम निबंधक कार्यालयात जागा विक्रीच्या दस्तावर ना. महेश शिंदे यांनी स्वाक्षरी केली. यावेळी कोरेगाव विकास आघाडीचे पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते.

१९९५ साली मंजूर झालेल्या व प्रत्यक्षात कार्यरत असलेल्या कठापूर येथील पाणीपुरवठा योजनेवरून सध्या शहराच्या बहुतांश भागाला पाणीपुरवठा केला जातो. कोरेगाव शहराचा वाढता विस्तार आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन अमृत केंद्र सरकारच्या अमृत दोन मधून कोरेगाव शहरासाठी नवीन २४ बाय ७ पाणी योजना मंजूर करण्यात आलेली आहे. त्यासाठी ६७ कोटी रुपयांचा निधी देखील मंजूर झाला आहे. या योजनेला तांत्रिक मान्यता मिळाली आहे. ही योजना गुरुवर्य कै. लक्ष्मणराव इनामदार जिहे कठापूर उपसा जलसिंचन योजनेच्या बंधाऱ्यालगत काही अंतरावर केली जाणार आहे. कृष्णा आणि वसना नदीच्या संगमावर कृष्णा नदीकाठी ना. महेश शिंदे यांच्या स्वमलकीची जमीन असून ही जमीन आता नवीन पाणी योजनेच्या पंप हाऊस व जॅकवेलसाठी देण्यात आली आहे.



**कोरेगाव नगरपंचायतीला खरेदी खत करून स्वतःची कृष्णा नदीकाठची जागा हस्तांतर करताना नामदार महेश शिंदे शेजारी नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, राहुल प्रकाश बर्गे, प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, कोरेगाव विकास आघाडीचे पदाधिकारी, सदस्य व शासकीय अधिकारी.**

या बंधाऱ्यात साठणाऱ्या पाण्याद्वारे कोरेगाव शहराला २४ तास पाणी उपलब्ध होणार आहे. बंधाऱ्यात सातत्याने पाणी उपलब्ध राहणार असल्याने कोरेगावला कधीही पाणी कमी पडणार नाही.

ना. महेश शिंदे यांनी गुरुवारी दुय्यम निबंधक कार्यालयात कोरेगाव नगरपंचायतीच्या नावे ही जागा विना मोबदला खरेदी खत करून दिलेली आहे. नगरपंचायतीच्यावतीने मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी स्वाक्षरी केली आहे. यावेळी तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, दुय्यम निबंधक स्वामीनाथ देशमुख, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहूल प्रकाश बर्गे, कोरेगाव विकास आघाडीचे अध्यक्ष तथा प्रथम नगराध्यक्ष प्रशांत उर्फ राजाभाऊ बर्गे, उपनगराध्यक्ष सुनीलदादा बर्गे, माजी नगरसेवक महेश साहेबराव बर्गे, सचिनभैय्या बर्गे, रशीद शेख, नगरसेवक साईप्रसाद बर्गे, सागर वीरकर, प्रीतम शहा, संतोष बर्गे यांच्यासह कोरेगाव विकास आघाडीचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

कोरेगाव विधानसभा मतदारसंघाची राजधानी असलेल्या कोरेगाव शहरातील सर्व रहिवासी हे माझ्या कुटुंबातील सदस्य असून त्यांना पुढच्या चाळीस वर्षे पाणी समस्येला सामोरे जाऊ लागू नये, त्यांना अहोरात्र पाणी मिळावे यासाठी ही शिंदे कुटुंबियांची जागा आज विना मोबदला नगरपंचायतीला दिली आहे. कोरेगाव शहराच्या ऋणातून उत्तराई होण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. भविष्यकाळात कोरेगाव शहरासाठी लागेल ते योगदान देणार असल्याचे ना. महेश शिंदे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# धर्मांधता नाकारून देशहितासाठी समाजमनात बुद्ध-आंबेडकर रुजवूयात: प्रा.डॉ.सुभाष वाघमारे

## सातारा-कोडोली बुद्धविहारात गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** अलीकडच्या काळात देशात उन्मादी वातावरण तयार झालेले आहे. काही संघटना धर्मांध होऊन कायद्याचा अनादर करत सर्वत्र हिंसक वातावरण तयार करीत आहेत. कधी कधी ते कायद्याला देखील जुमानत नाहीत अशी अवस्था झाली आहे. शिक्षण स्वतःचे आणि देशहितासाठी घ्यायचे असते हे संस्कार होत असूनही ,कोण जातीय धार्मिक हिंसा पसरवत आहे,त्याचा प्रत्येक भारतीयांनी शोध घेतला पाहिजे.सरकारने देखील या धार्मिक उन्मादी शक्तींवर कायदेशीर मार्गाने कारवाई केली पाहिजे. समाजात भयमुक्त वातावरण निर्माण करणे ही सरकारची जबाबदारी असते.आपण घेतलेले शिक्षण हे समाजाचे कल्याण करण्यासाठी आहे,ते विध्वंस करण्यासाठी नाही हे भान प्रत्येक विद्यार्थ्याने ठेवले पाहिजे. भारतीय संविधानाच्या मार्गाने वाटचाल केली पाहिजे. शांतता आणि सुव्यवस्था ठेवणे ही सर्वच नागरिकांची जबाबदारी असेल तर मग हिंसा कोण करते आहे ? शिक्षणाने अकुशल कर्मे न करता कुशल कर्मे केली पाहिजेत. विद्यार्थ्यांना लहानपणापासून घरातच चांगले संस्कार केले तर ते देशाचे हित करतील. चांगल्या संस्काराच्या लोकांची देखील एकजूट बनून एक नैतिक शक्ती तयार होण्याची गरज आहे. समता,स्वातंत्र्य ,बंधुता,न्याय या गोष्टी समाजात आणण्यासाठी अहिंसक आणि विचारी माणसे समाजात निर्माण करणे आवश्यक असते. पण आज शिक्षण घेतलेल्या मुलांच्या पुढे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. वाईटाची संगत करण्यापेक्षा चांगल्याची संगत करावी. स्वतःचे,कुटुंबाचे व समाजाचे संरक्षण करण्यासाठी दमदार शिक्षण घ्यावे, आयुष्यभर निर्व्यसनी रहावे, गुणवत्ता वाढवून देशातच नव्हे परदेशात देखील शिक्षण घेण्याची योग्यता निर्माण करायला पाहिजे.भोवताली धर्मांधता असेल तर वातावरण बिघडत जाईल म्हणून धर्मांधता नाकारून देशहितासाठी समाजमनात बुद्ध आंबेडकर रुजवूयातफ असे मत प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी व्यक्त केले. २८ जुलै २०२४ रोजी कोडोली येथील बौद्ध विहारात १० वी व १२ वी पास झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. गोरख बनसोडे हे होते. प्रा. रमेश जाधव,रा.वि.भोसले ,एजुकेशन मोटीव्हेटर अमित घोडके,उद्योजक विकास निकाळजे ,सेवानिवृत्त असिस्टंट रजिस्ट्रार हनमंतराव गायकवाड ,अप्पा कीर्तिकुडाव ,,संदीप गायकवाड,नितीन गायकवाड ,अविनाश गायकवाड ,राहुल जाधव ,सुनील साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बुद्ध आणि आंबेडकर यांचा आदर्श सर्व माणसांना हितकारी कसा हे सांगताना ते पुढे म्हणाले की बुद्ध शील ,समाधी व प्रज्ञा यांच्या आधारे सदाचारी ,करुणाशील माणसे तयार करत असत. जीवन सुखी करायचे असेल तर निर्मळ मन हवे आहे. मन घडवेल तसा माणूस घडतो असे विचार ते सांगतात .बुद्ध कधीही हिंसेला उत्तेजन देत नाहीत. सर्वांचे मंगल होण्यासाठी एक चांगली आचारसंहिता त्यांनी दिली. वाईट न करता चांगले करत गेलो तर देश लवकर चांगला होईल , पण इथे विषमता भरलेली आहे .ही आर्थिक आणि सामाजिक विषमता दूर करणारे विचारी व निर्भय नेतृत्व इथे हवे आहे. बाबासाहेबांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग करून सर्वांचे हित केले. लोकशाहीचा मार्ग पुढे न्यायचा असेल तर



व्यक्तिपूजा टाळली पाहिजे .हिंसा नको आहे. विधायक विचार आणि विधायक कृती हेच सर्वांचे धोरण असायला पाहिजे. पण इथे भ्रष्टता,हिंसा ,व्यसनाधीनता ,धाक आणि भीती ,या गोष्टी वाढत असतील तर नक्कीच सामाजिक स्वास्थ्य नीट राहणार नाही. बुद्ध आणि आंबेडकर या नेतृत्वाने कधीही कोणाचे नुकसान न करता न्याय आणि हितच केले,त्यामुळे सर्व माणसे सुखी करायची असतील तर शक्य तितक्या लवकर शिक्षणात शांतता ,सदाचार आणि न्यायासाठी विचार व कृती करणारे बुद्ध आंबेडकर हवे आहेत.वैज्ञानिक दृष्टीकोन हवा आहे.बाबासाहेब अनेक अडचणी असताना परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेऊन भारतातील सर्वांच्या न्यायासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग केला तोच हितकारी आदर्श सर्व मुलांनी घेतला पाहिजे,मधूनच शिक्षण सोडू नका,आयुष्यभर शिक्षण चालू ठेवा असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. गोरख बनसोडे म्हणाले की अभ्यास करण्याची सवय लावून घेतली पाहिजे .पालकांनी स्वतःच्या मुलाकडे सतत लक्ष देऊन चांगले शिक्षण दिले पाहिजे.बाबासाहेब यांच्यासारखे परदेशात जाण्याची वेळ आली तर जा पण पुन्हा परत येऊन आपल्या कुटुंबाची ,समाजाची देशाची काळजी घ्या असेही ते म्हणाले. प्रा.रमेश जाधव ,राहुल जाधव यांनी मनोगते व्यक्त करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी वंदना,सूत्रपठण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य वामन गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय विजय गायकवाड यांनी करून दिला. गुणवंत विद्यार्थ्यांना वही,पेन व एक झाड देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. आभार बिपीन गायकवाड यांनी मानले.या कार्यक्रमास सर्व समाज बांधव,महिला भगिनी उपस्थित होत्या. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी प्रशांत गायकवाड ,विक्रम गायकवाड ,सुशांत गायकवाड ,अमित गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# वडूज ग्रामीण रुग्णालयात शस्त्रक्रियांचे शतक: याशनी नागराजन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज:** राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत खटाव तालुक्यातील वडूज येथिल ग्रामीण रुग्णालयात आयोजित बाल शस्त्रक्रिया शिबिरास रुग्ण व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.या शिबिरात शंभर पेक्षा अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्या.या यशस्वी समाजभिमुख उपक्रमाबद्दल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांनी आरोग्य विभागाचे कौतुक केले. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. विजय गायकवाड, जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षिका श्रीम. असिया पट्टनकुडे यांचे मार्गदर्शनाखाली वडूज येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत ० ते १८ वयोगटातील शस्त्रक्रियेसाठी संदर्भित बालके व विद्यार्थी यांचे मोफत शस्त्रक्रिया शिबीर पार पडले. सदर शस्त्रक्रिया शिबिर हे सायन हॉस्पिटल,



**वडूज येथिल ग्रामीण रुग्णालयात १०६ बाल शस्त्रक्रिया यशस्वी करणारी हीच आरोग्य टीम.**

मुंबई व ग्रामीण रुग्णालय, वडूज यांचे संयुक्त विद्यमाने पार पडले..ह्या शिबिरात १०६ बालकांवर पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ह्या शस्त्रक्रिया मध्ये फायमोसिस, टंग टाय, हर्निया, हैड्रोसिल, पेंडिक्स, व इतर शस्त्रक्रिया यांचा समावेश आहे.. सदर शिबिरामध्ये सायन हॉस्पिटल, मुंबई येथील डॉ. पारस कोठारी यांच्या टीम ने ह्या शस्त्रक्रिया पार पाडल्या, ह्या टीम मधे डॉ. अमीर खान ( भुलतज्ञ ), डॉ. सुकन्या विंचुलकर( सर्जन ), डॉ. अदिती दळवी ( सर्जन), डॉ. मुग्धा नाईक (सर्जन) श्रीम. विदुला मजली ( सीनिअर स्टाफ नर्स) , श्रीम. कुमुद खडपे ( समन्वयक) यांचा समावेश होता.

सदर शिबिर पार पाडण्यासाठी ग्रामीण रुग्णालय, वडूज च्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. लीला मदने, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण मोहिते, बालरोग तज्ञ डॉ. राजेश देवकर, डॉ. रितेश शहा, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष मोरे, डॉ. प्रवीण तोरणे, डॉ. सम्राट भादुले, डॉ. अनिकेत पवार, डॉ. स्वप्नजा देशपांडे, डॉ. रूपाली मुळे, डॉ. स्नेहा झनकर, औषध निर्माता सौ. सारिका लावंड, श्री. सुशांत परीट , सौ. स्नेहा जंगम, सौ. शुभांगी माळवे,परिचारिका सुनीता खाडे, पुष्पा गाडे, स्वाती पोळ, राणी पोतदार तसेच ग्रामीण रुग्णालय मधील परिचारिका आशा सांगळे , वैशाली शिंदे, सविता गंभरे, श्री. अक्षय कुलकर्णी, रेश्मा शिंदे, सोनाली खुडे, गायत्री झिरपे याचबरोबर श्री. वाघ, श्री. फडतरे, श्री. कदम, श्री. राठोड, श्री. राहुल त्याचबरोबर प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. राजकुमार ओंबासे व सर्व कर्मचारी तसेच कार्यालयीन अधीक्षक श्री. शैलेश जानुगडे, लिपिक श्री. परमार व रुग्णालयातील सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी , सर्व वाहन चालक , सफाई कर्मचारी, सिक्युरिटी स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# दहिवडी पोलीस स्टेशन पुन्हा एकदा जिल्ह्यात नंबर वन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**म्हसवड :** मे आणि जून २०२४ मध्ये दहिवडी पोलीस स्टेशनला महिला पथदर्शी प्रकल्पांतर्गत संपूर्ण जिल्ह्यामध्ये सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल, सर्वात जास्त मुद्देमाल निर्गती केल्याबद्दल, सर्वात जास्त नॉन बेलेबल वॉरंट बजावून आरोपी अटक केल्याबद्दल आणि माननीय न्यायालयात जास्तीत जास्त गुन्हे दोषसिद्धी करण्यासाठी प्रयत्न केल्याबद्दल बेस्ट पोलीस स्टेशन इन महिला पथदर्शी प्रकल्प तसेच बेस्ट पोलीस स्टेशन इन मुद्देमाल निर्गती तसेच बेस्ट पोलीस स्टेशन इन नॉन बेलेबल वॉरंट बजावणी आणि बेस्ट पोलीस स्टेशन इन कनविक्शन रेट असे पाच पुरस्कार माननीय पोलिस अधीक्षक श्री समीर शेख सर आणि अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल मॅडम यांच्या हस्ते आज रोजी सातारा येथे देण्यात आले

सदरची कामगिरी १)सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे २)विलास कुऱ्हाडे ३)नीलम रासकर ४) भामाताई काळे ५) विलास हांगे यांनी केली आहे..



**पुरस्कार प्रदान करताना पोलिस अधीक्षक श्री.समीर शेख, अप्पर पोलिस अधीक्षक आचल दलाल (छाया: विजय भागवत)**

**सहकार महर्षि हणमंतराव दिनकरराव पवार सहकारी कुक्कुटपालन सोसायटी मर्या. फलटण जि सातारा**

**निविदा सुचना**

या संस्थेच्या मालकीचा चालुस्थितीतील मित्सुबिशी (व्हीएसटी) कंपनीचा छोटा ट्रॅक्टर मॉडेल व्हीटी २२४ सन २०१४ MH११BA ७३६९ विक्रीसाठी संस्था निविदा मागवित आहे. सदर वाहन (ट्रॅक्टर) संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळेल. तरी इच्छुकांनी दिनांक ०९.०८.२०१४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजेपर्यंत सिलबंद लखोटयात निविदा सादर कराव्यात. विक्रीच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.

प्राप्त निविदा संस्थेच्या संचालक मंडळ सभेत उघडणेत येतील. निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे सर्व अधिकार संस्थेने राखून ठेवले आहेत.

**सही/-**

**चेअरमन सहकार महर्षि हणमंतराव दि. पवार सहकारी कुक्कुटपालन संस्था मर्या. फलटण. जि सातारा**

# उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात : अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** वीज, पाणी, स्वच्छता यासारख्या पायाभूत सुविधा विनाविलंब व विनाअडथळा उपलब्ध होणे आवश्यक आहे. यंत्रणांनी उद्योगांना या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. याबरोबरच औद्योगिक विकासामध्ये स्थानिक जनतेला योग्य वाटा मिळावा यासाठी सुक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल औद्योगिक उपक्रमांमध्ये किमान ८० टक्के स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची तात्काळ कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी दिले.

जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्या अक्ष्यक्षतेखाली झाली. या बैठकीला जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री. दंडगव्हाळ, मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ साताराचे श्री. मोहिते, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त सुनिल पवार, एमआयडीसीचे राहूल भिंगारे व विविध औद्यागिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत उद्योजकांच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा होवून उद्योजकांच्या अडीअडचणी यंत्रणांनी प्राधान्याने सोडवाव्यात, असे निर्देश देवून ज्या औद्योगिक वसाहतींमध्ये रस्त्यांवर फलक लावणे, स्पीड ब्रेकर लावणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी ही कार्यवाही येत्या ४ ते ५ दिवसात करावी. औद्योगिक वसाहतीतील घटकांसाठी पुरेसे डीपी ट्रान्सफार्मर बसवून विद्युत पुरवठा करावा. राष्ट्रीय महामार्गाकडून जुन्या औद्योगिक क्षेत्राकडे जाणारा रस्ता एमआयडीसीच्या हद्दीमध्ये १० मीटर आत आला आहे. नॅशनल हायवे थॉरिटीने येत्या १५ दिवसात याची मोजणी करावी. सातारा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रातील कचरा प्रक्रिया सुविधेसंदर्भात शासन निर्णयानुसार कार्यवाही व्हावी. औद्योगिक क्षेत्रातील अनधिकृत टपऱ्या काढण्यासाठी कार्यवाही करावी, अशा सूचना देवून सातारा येथे उभारण्यात येणारे एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी कार्यालय उभारत असताना ते सर्व सुविधांनी युक्त राहील याची खबरदारी घ्यावी. सातारा औद्यागिक क्षेत्रात महावितरणाला नवीन उपकेंद्र उभारण्याबाबतची कार्यवाही आचारसहिंतेपुर्वी पूर्ण करावी, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांनी दिले.

सातारा येथे इएसआयसीच्या हॉस्पीटलसाठी जागा वाटपासाठी मंत्रालय स्तरावर प्रस्ताव दाखल करण्यात आल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत तीन लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात प्रशिक्षणार्थी म्हणून नियुक्ती आदेश जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्र यांच्यामार्फत अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांच्या हस्ते देण्यात आले. या योजनेचा उद्देश उमेदवारांना उद्योजकांकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करुन उद्योजकांना आवश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेअंतर्गत ६ महिन्यासाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येते. किमान २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्यप्रशिक्षणासाठी सहभागी होवू शकतात. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय, आस्थापना, महामंडळे सहकारी संस्थांही उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी नोंदणी करु शकतात. यामध्ये १२ वी पास शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांना ६ हजार, आयटीआय/पदविका असणाऱ्या उमेदवारांना ८ हजार रुपये, पदवीधर/पदवीत्त्युर शैक्षणिक अर्हता असणाऱ्या उमेदवारांना १० हजार रुपये, प्रतिमाह विद्यावेतन देण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, विकास रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्रामध्ये सागर कदम यांना तर कूपर कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीमध्ये रिया घाटगे व निखिल वाघमारे या उमेदवारांना प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणून नियुक्ती देण्यात आली.

# जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** जिल्ह्यातील धरणांमध्ये एकूण १२७.९७ अब्ज घन फूट (टिएमसी)पाणी साठा असल्याचे उपकार्यकारी अभियंता, कृष्णा सिंचन विभाग, सातारा यांनी कळविले आहे.

जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा पुढीलप्रमाणे असून सर्व आकडे अब्ज घन फूटमध्ये आहेत. कंसामध्ये धरणसाठ्याची टक्केवारी दिली आहे.

मोठे प्रकल्प -

कोयना - ८६.७२ (८२.३९), धोम - ११.५१ (८५.२६), धोम - बलकवडी - ३.४४ (८४.३१), कण्हेर - ८.०१ (७९.३१), उरमोडी - ८.१२ (८१.५३), तारळी - ५.०४ (८६.१५).

मध्यम प्रकल्प -

येरळवाडी - १.१५८ (१००.००), नेर - ०.१४ (३३.६५), राणंद - ०.१६ (६३.७५), आंधळी - ०.१६ (४८.९३), नागेवाडी- ०.१८ (७९.५७), मोरणा - ०.९५ (६८.३५), उत्तरमांड - ०.६० (६८.५२), महू - ०.८९ (८०.९१), हातगेघर - ०.१२ (४७.३१), वांग (मराठवाडी) - २.०६ (७५.४९) या प्रमाणे पाणीसाठा आहे.

# जिल्ह्यात सरासरी २१.५ मि.मी. पाऊस

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** जिल्ह्यात दि. २ ऑगस्ट रोजी सरासरी २१.५ मि.मी. पावसाची नोंद झाली असून १ जून पासून आतापर्यंत एकूण सरासरी ७५७.५ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे. सर्व आकडे मि.मी.मध्ये असून कंसातील आकडे आतापर्यंतच्या एकूण पावसाचे आहेत. सातारा - ३२.७ (७३२.४), जावली-मेढा - ४७.४ (१३४०.४), पाटण - ३३.६ (११७२.३), कराड -१८.२ (७०३.०), कोरेगाव -१४.२ (५४८.३), खटाव - वडूज - ८.९ (४१५.३), माण - दहिवडी - ३.५ (३०६.५), फलटण - ०.७ (३३०.४), खंडाळा - ४.७ (२९८.५), वाई - २४.३ (६६७.३), महाबळेश्वर - ७३.५ (२६१८.५) या प्रमाणे पाऊस झाला आहे.

# स्वामी समर्थ महाराष्ट्र इंस्टीट्यूट ऑफ हॉटेल व्यवस्थापन संस्थेत प्रवेश प्रक्रिया सुरू

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाद्वारे संचलित सोलापूर येथील स्वामी समर्थ महाराष्ट्र इंस्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी या संस्थेत ३ वर्षाच्या बी.एस.सी. (एचएचए) पदवी तसेच पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षामध्ये प्रवेशासाठी पात्र उमेदवारांकडून ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत, अशी माहिती संस्थेच्या प्राचार्यांनी कळविली आहे.

बीएससी हॉस्पिटलिटी अँड हॉटेल डमिनिस्ट्रेशन हा ३ वर्षे कालावधी तसेच फूड प्रॉडक्शनमध्ये पदविका, बेकरी व कन्फेक्शनरीमध्ये पदविका, फूड अँड बेवरेज सर्व्हिसमध्ये पदविका या दीड वर्षे कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवारांनी मान्यताप्राप्त १०+२ प्रणालीमध्ये कोणत्याही विद्याशाखेमध्ये ४० टक्के गुण मिळवून १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वीच्या अभ्यासक्रमामध्ये इंग्रजी हा विषय अनिवार्य असून त्यात उत्तीर्ण असावे. अंतिम पदवी प्रदान करण्याकरिता अभ्यासक्रमाला जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची मान्यता राहील.

पदवी आणि पदविका अभ्यासक्रमासाठी वयोमर्यादेची अट नसून पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम येणाऱ्यास प्राधान्य तत्त्वावर प्रवेश देण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी ए-१६०, कंबर तलाव जवळ, धर्मवीर संभाजी महाराज उद्यान, विजापूर रोड, सोलापूर या पत्त्यावर अथवा ९८९०५६६९९८, ९७६७२५७०२१ किंवा ९३७३०५०७०७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# टपाल खात्यातर्फे राखी पाकिटे वितरणासाठी स्वतंत्र पत्रपेट्यांची सोय

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** राखी पाकिटांचे भारतातील सर्व ठिकाणी लवकर वितरणासाठी सातारा टपाल विभागातर्फे भेट कार्ड स्वीकारण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून या सुविधेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सातारा विभाग डाकघरचे वरिष्ठ अधीक्षक यांनी केले आहे.

जिल्ह्यातील मोठ्या पोस्ट ऑफिसमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी जाणाऱ्या मेल्ससाठी स्वतंत्र पत्रपेट्या, ट्रे ठेवलेल्या आहेत. सातारा जिल्ह्यातील विविध डाकघरांसाठी पुढीलप्रमाणे स्वतंत्र पत्रपेट्या ठेवल्या आहेत. सातारा जिल्ह्यात सातारा प्रधान डाकघर- पिनकोड नं. ४१५००१, सातारा शहर- ४१५००२, एमआयडीसी सातारा- ४१५००४, संगमनगर सातारा- ४१५००३, वाई- ४१२८०३, कोरेगांव- ४१५५०१, लोणंद- ४१५५२१, महाबळेश्वर- ४१२८०६, फलटण- ४१५५२३, पाचगणी- ४१२८०५ याप्रमाणे पिनकोड आहेत. या पोस्ट ऑफीसमध्ये सातारा शहर आणि जिल्हा, पुणे शहर, पुणे जिल्हा, सांगली जिल्हा, कोल्हापूर जिल्हा, उर्वरीत महाराष्ट्र, उर्वरीत भारत साठी स्वंतत्र पेट्या किंवा ट्रे ठेवण्यात आल्या आहेत.

या मुख्य पोस्ट कार्यालयाव्यतिरीक्तही इतर पोस्टातही राखी पाकिटे स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी त्यांची राखी पाकिटे पोस्ट कार्यालयात व्यवस्था केलेल्या पत्र पेट्या, ट्रे यामध्ये टाकावी किंवा टपाल कर्मचारी यांचेकडे द्यावीत. याबाबतीत काही अडचण असल्यास जवळच्या पोस्ट ऑफिस मधील कर्मचाऱ्यांची मदत घ्यावी, असेही वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांनी कळविले आहे.

# भज्यांचा धुंवाधार पाऊस



पावसाळ्यात खिडकीत बसून पावसाचा आनंद घेत कुरकुरीत कांदा भजी खाण्याची मजा काही औरचं असते. तुम्ही आतापर्यंत अनेक प्रकारच्या वेगवेगळ्या भजी खाल्ल्या असतील पण कधी भज्यांचा पाऊस रेसिपी ट्राय केलीय का? नाही ना मग आम्ही तुमच्यासाठी ही आगळी-वेगळी रेसिपी घेऊन आलो आहोत.

भज्यांचा पाऊस साहित्य

२ कप बेसन
१/४ कप तांदळाचे पीठ
१ बटाटा
१ कांदा
१ काकडी
१ वांग
७-८ फ्लॉवर चे तुरे
१/४ कप किसलेला दुधी
८-९ ओव्याची पाने
१ टोमॅटो
१ शिमला मिरची
१ टिस्पून तिखटआवडीनुसार
१/२ टीस्पून हळद
१/४ टीस्पून ओवा
१/४ टीस्पून हिंग
१/४ कप कोथिंबीर चिरून
१ टीस्पून मीठचवीनुसार कमी जास्त
१/२ ते १ कप पाणी.आवश्यकतेनुसार
तळण्यासाठी तेल

भज्यांचा पाऊस कृती

१. बेसन, तांदळाचे पीठ, तिखट, हळद, हिंग, ओवा कोथिंबीर हे सगळं एकत्र करून घेतले, पाणी घालून मिश्रण तयार केले.

२. कांद्याची तीन प्रकारे भजी केली. गोल रिंगचा आकारात कापले,बारीक कापले आणि उभे कापून. पिठात घोळवून तेलात तळून घेतली.

३. काकडी सोलून, गोलाकार कापून ती पिठात घोळवून तेलात तळून घेतली.शिमला मिरची उभी चिरून ती पिठात घोळवून तेलात तळून घेतली.

४. वांगी गोलाकार कापून, टोमॅटो गोलाकार कापून, बटाटे गोलाकार कापून पिठात घोळवून तेलात तळून घेतली.

५. ओव्याची पाने पिठात घोळवून तेलात एकेक पान सोडून तळून घेतले. फ्लॉवरचे तुरे पिठात घोळवून तेलात एकेक करून तळले. दुधीचा कीस पिळून मग पिठात घोळवून तेलात तळून घेतला.

५. सगळी भजी छान कुरकुरीत होईपर्यंत तळून घेतली. सोबत हिरव्या मिरच्या मधे चीर देऊन तळून घेतल्या.

६. गरमागरम चहासोबत आहे की नाही हा भज्यांचा धुंवाधार पाऊस. एकदम मस्त.

पान १ वरुन

## मनू पुन्हा फायनलमध्ये...

गुण मिळवले. तिने पहिल्या सीरिजमध्ये १००, दुसऱ्या सीरिजमध्ये ९८ आणि तिसऱ्या मालिकेत ९८ गुण मिळवले.

मनू भाकरच्या नावावर विक्रमांची मांदियाळीमनू भाकर ऑलिम्पिक पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली आहे.एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.दोन ऑलिम्पिक पदके जिंकणारी पहिला भारतीय नेमबाज ठरण्याचा विक्रमही तिच्या नावावर नोंदला गेला आहे.ऑलिम्पिकमध्ये सांघिक पदक जिंकणारी मनू भाकर आणि सरबज्योत सिंग ही पहिली भारतीय नेमबाजी जोडी ठरली आहे. वैयक्तिक आणि सांघिक दोन्ही प्रकारात ऑलिम्पिक पदक जिंकणारी मनू भाकर पहिली नेमबाज ठरली आहे.पॅरीस ऑलिम्पिकमध्ये मनूने घडवला इतिहासपॅरीस आलिम्पिकमध्ये मनू भाकरने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. तिने प्रथम १० मीटर एअर पिस्टल प्रकारात कांस्य पदक पटकावले. एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके पटकवणारी ती देशातील पहिली खेळाडू ठरली आहे.

## कोयनेचे सहा वक्र दरवाजे...

आहे. धरणातील पाणी पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी नदीपात्रात प्रतिसेंकद ५२ हजार १०० क्युसेक्स सोडण्यात येत असल्यामुळे कोयना नदीला पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. कोयना नदीला निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे नदी काठावरील सांगली, कराड, पाटण शहरासह आदी गावांनी तसेच नागरिकांनी सावधानता बाळगावी. व सुरक्षित स्थळी स्थलांतरित व्हावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सातारा बंदला प्रतिसाद...

बंदमुळे गर्दीने गजबजणारा राजवाडा परिसर, चौपटी, राजपथ, खणआळी, खालचा रस्ता, पोवई नाका, बसस्थानक परिसरात दिवसभर शुकशुकाट पसरला. बंदची कल्पना नसल्याने कामकाजानिमित्त साताऱ्यात आलेल्या ग्रामीण भागातील नागरिकांना आल्या पावली माघारी जावे लागते. दरम्यान, शुक्रवारी सकाळी हिंदू जनजारण समिती, विश्व हिंदू परिषद, शिव प्रतिष्ठान तसेच बजरंग दलाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन दिले. या आंदोलनात बजरंग दलाचे हेमंत सोनावणे, हिंदू जनजगारण समितीच्या रूपाली महाडिक, हिंदू महासभेचे धनराज जगताप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जितेंद्र दामले, मातृशक्ती विभागाच्या विद्या कदम, विश्व हिंदू परिषदेचे विजय गाडवे, जितेंद्र वाडेकर आदींनी सहभाग घेतला. या आंदोलनानंतर बजरंग दलाकडून शहरात रॅली काढण्यात आली. रॅलीत हत्येच्या दोन्ही घटनांना तीव्र निषेध नोंदविण्यात आला. कार्यकर्त्यांकडून निषेधाच्या घोषणाही देण्यात आल्या. दुपारी दोननंतर शहरातील काही दुकाने उघडण्यात आली.

## दीपक देशमुख यांच्या घरी ईडी

कुठल्याही रुग्णावर उपचार केले नाहीत. करारनाम्यात ४६ डॉक्टरांची बोगस नावे घुसवून स्वतःच्या फायद्यासाठी सरकारची आणि संस्थेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाली.करोना उपचार केंद्र म्हणून रुग्णालय ताब्यात घेतल्यानंतर सरकारने एक कोटी रुपयांची औषधे, इंजेक्शन पुरवली होती. कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे पैसेही दिले होते. असे असतानाही बोगस रुग्णांची नोंदणी करून महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा गैरलाभ उठवला.

कोरोना संसर्गामुळे मृत्यू झालेल्या २०० हून अधिक रुग्णांना दोन- तीन महिन्यांनंतर पुन्हा जिवंत दाखवले आणि ते रुग्णालयात दाखल असल्याची नोंद करून विविध सरकारी योजनांतर्गत उपचाराचे कोट्यवधी रुपये लाटले.

संस्थेचा कोणताही ठराव न करता बोगस लेटरहेड, बनावट शिक्क्यांच्या आधारे बनावट बँक खाते उघडले आणि गैरव्यवहाराचे पैसे वळते केले. करोनाचा साधारण संसर्ग झालेल्या रुग्णांना डिस्चार्ज देताना आयसीयूच्या बेडवर झोपवले आणि कोरोना उपचाराच्या रकमेचे मोठे पॅकेज लाटले. रुग्णालयात सात व्हेंटिलेटर होते. त्यानुसार महिनाभरात २१ रुग्ण व्हेंटिलेटरवर उपचार घेऊ शकत होते. मात्र, त्या ठिकाणी १५० ते २०० रुग्णांना व्हेंटिलेटरवर ठेवल्याच्या बोगस नोंदी केल्या.

एफआयआर रोखण्यासाठी पोलिसांवर प्रचंड दबाव

जयकुमार गोरे यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक आणि स्थानिक पोलिसांवर त्यांचा प्रचंड दबाव आहे. त्यामुळेच घोटाळ्याची तक्रार तसेच संपूर्ण गैरव्यवहाराचे कागदोपत्री पुरावे सादर करूनही पोलिसांनी गोरे दाम्पत्य व इतर आरोपींविरुद्ध अद्याप एफआयआर दाखल केलेला नाही. गोरे यांच्या दबावामुळेच पोलीस एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ करताहेत, असा दावा याचिकाकर्ते दीपक देशमुख यांनी केला आहे.

## सातारा येथे शांतता रॅली..

भगिनी बाहेर पडले पाहिजे यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक मराठा बांधवांनी या रॅलीसाठी आपल्या. सोबत किमान चार बांधवांना जातीसाठी. आणलेच पाहिजे. या रॅलीसाठी मराठा माता भगिनींचा देखील मोठा प्रतिसाद मिळणार असताना तो पाटण तालुक्यातून पण दिसला पाहिजे. यासाठी मराठा बांधवांनी आपल्या घरातील माता भगिनींना समाविष्ट करुन घ्यायचे आहे. तसेच रॅलीच्या जनजागृती साठी प्रत्येक विभागाचे एकत्र नियोजन करुन गावा गावात स्पीकर रिक्षा फिरवून शांतता रॅलीला येण्याचे आवाहन करावे. व त्या आशयाचे गावागावात प्रमुख ठिकाणी बॅनर लावावे. प्रत्येक गावातील कट्टर मराठा बांधवांनी एकत्र येऊन शनिवार दि. १० ऑगस्टला सातारा येथे शांतता रॅलीसाठी येण्यासाठी शक्यतो चार चाकी वाहनांची स्वव्यवस्था करावी. पावसाळी दिवस आहेत टू व्हीलर वरुन येण्याचा आग्रह नसावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

आदी ठराव सर्वानुमते घेण्यात आले आहेत. तरी मराठा सैनिकांनी १० ऑगस्ट रोजी सातारा येथे होणाऱ्या मराठा आरक्षण शांतता रॅलीसाठी एक दिवस काम, धंदा, व्यवसाय बंद ठेवून व नोकरदारांनी रजा काढून सातारा येथे लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे.. असे आवाहन करण्यात आले आहे.

## अस्तित्वात नसलेल्या प्रियकरासाठी

घडल्या आहेत.मात्र या घटनेने अनेकांच्या डोळ्यात अंजन घातले आहे. जो व्यक्तीचं अस्तित्वात नाही त्याच्यासाठी स्वतचं जीव देण्याची वेळ एखाद्या वर यावी हे खर तर कुणालाच पटल नाही चेष्टा करावी पण ती ठराविक मर्यादे पर्यंत ठीक आहे मात्र त्याची मस्करी नको याच भान ठेवण गरजेच आहे. फेक अकाउंट काढून मजा बघणारे आहेत पण आपल्या मुळे कुणाला तरी जीव देण्यापर्यंतची वेळ यावी हे दुर्दैव आहे. फेसबुक, व्हॉटस्प , इंस्टाग्राम या बाबत सकारात्मक चर्चा घडावी मात्र गैरवापर नको मात्र मोबाईल हॅक करण्यापर्यंत यात गुन्हेगारी वाढली केवळ या माध्यमातून होणारी फसवणूक आज जीव घेणी ठरू लागली आहे त्यामुळे भविष्यातील जीवित हानी टाळण्यासाठी या वर कडक निर्बंध घालन गरजेच आहे. काही महिन्यांपूर्वी व्हॉट प वरून कोरेगाव तालुक्यातील एका शालेय .मुलास व्हिडीओ कॉल केला त्या मधील अश्लील पना त्या युवकाच्या जीवावर बेतला ही घटना ताजि असताना याच भागात फेक अकाउंट वरून झालेली चेष्टा आयुष्याची मस्करी करून गेली खरतर आता आपली सर्वांची जबाबदारी वाढली आहे शोशल मीडिया चा योग्य वापर करण्यासाठी आपल्या मुलावर लक्ष ठेऊन आपल दुरावत असलेलं नातं घट्ट करण्यासाठी पुढाकार घेणं आवश्यक आहे.

# गणेश मंडळांना मंडपासाठी सलग ५ वर्षाची परवानगी, ६ ऑगस्टपासून एक खिडकी योजनेनुसार मिळणार ऑनलाइन परवानगी

**मुंबई :** गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गणपती मंडळांना मंडप उभारण्यासाठी परवानगी देण्याची प्रक्रिया येत्या ६ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. गेली दहा वर्ष शासन नियमांचे व कायद्याचे पालन करणाऱ्या, कोणतीही तक्रार नसलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सलग पाच वर्षांकरिता विभाग कार्यालयामार्फत एकदाच परवानगी देण्यात येणार आहे. असे असले तरी दरवर्षी परवानगी नूतनीकरण करणे गरजेचे असेल.



गणेशोत्सवाला आता जेमतेम एक महिना शिल्लक असून गणेशोत्सव मंडळांची तयारी सुरू झाली आहे. ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून ऑगस्ट महिन्यापासून मोठ्या गणेशमूर्तींचे आगमन सुरू होते. त्यामुळे मंडपांच्या परवानगीसाठी पालिकेची यंत्रणाही सज्ज झाली असून राज्य सरकारच्या निर्णयानुसार उत्कृष्ट काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना यावर्षीपासून सलग पाच वर्षांसाठी परवानगी देण्यात येणार आहे. या मंडळांना दरवर्षी या परवानगीचे नूतनीकरण करावे लागणार आहे. या नुतनीकरणात वाहतूक आणि स्थानिक पोलिसांची परवानगी प्राप्त करणे आवश्यक असेल. याशिवाय खासगी जागेवर परवानगी प्राप्त झालेल्या मंडळांना उत्सवापूर्वी विहित कालावधीत जागामालक अथवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस यांची परवानगी प्राप्त करून घेणे आवश्यक असेल.

एक खिडकी योजनेनुसार ६ ऑगस्टपासून संगणकीय प्रणालीद्वारे सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप उभारणीसाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येणार आहे. प्राप्त अर्जांची विभागीय कार्यालयाकडून छाननी करण्यात येईल त्यानंतर स्थानिक पोलीस स्टेशन वाहतूक पोलीस विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन प्राप्त करून नियमानुसार मंडपासाठी परवानगी देण्यात येणार आहे. यंदा नव्यानेच सार्वजनिक उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांसाठी देण्यात येणारी मंडप उभारण्याची परवानगी ही या वर्षासाठीच मर्यादित असेल.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सन २०२४ च्या उत्सवासाठी अवघे १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून संगणकीय एक खिडकी पद्धतीने अर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी श्रीगणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांना मोफत शाडूची माती, मंडपासाठी नि:शुल्क जागा (प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार) देण्यात आली आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सवासाठी मूर्तीकारांना देण्यात आलेली परवानगी नवरात्रोत्सवापर्यंत कायम राहील. याशिवाय मूर्तीकारांसाठी एक खिडकी योजना देखील राबविण्यात आली आहे. आतापर्यंत १२३७ मूर्तिकारांकडून मंडप परवानगीसाठी ऑनलाइन अर्ज आले आहेत. आतापर्यंत मोफत शाडू मातीसाठी एकूण २१७ मूर्तिकारांनी मागणी केली असून, त्यांना आतापर्यंत सुमारे ५०० टन मोफत शाडू माती देण्यात आली आहे. त्यामुळे शाडू मातीपासून तयार केलेल्या गणेश मूर्ती स्थापना करण्याचे प्रमाण यंदा वाढणार आहे.

# पीकविम्यासाठी १.६५ कोटी अर्ज, राज्यातील १.१० कोटी हेक्टरवरील पिके संरक्षित

**पुणे :** खरीप हंगाम २०२४ मध्ये पंतप्रधान पीकविमा योजना अंतर्गत ३१ जुलैअखेर राज्यभरातून १ कोटी ६५ लाख ७० हजार ४३७ अर्ज दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांनी केवळ एक रुपया भरून आपले पीकविमा संरक्षित केले आहे.



कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान पीकविमा योजनेंतर्गत पीकविमा पोर्टलवर अर्ज दाखल करण्यास सुरुवातीला १५ जुलै ही अंतिम मुदत होती. मात्र, राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसह विविध कागदपत्रांसाठी सामूहिक सेवा केंद्रांवर गर्दी होती. शिवाय काही तांत्रिक अडचणीही येत होत्या. त्यामुळे बरेच शेतकरी विमा भरण्यापासून वंचित राहिल्याने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना विनंती करून ३१ जुलैपर्यंत मुदत वाढवून घेतली होती.

या १५ दिवसांच्या वाढीव मुदतीत २१ लाख ९० हजार अर्ज दाखल झाले आहेत. राज्यातील खरीप पेरण्या जुलैअखेर ९७ टक्क्यांवर गेल्या आहेत. खरीप क्षेत्र सुमारे १४० लाख हेक्टर आहे, त्यापैकी पीकविमा योजनेच्या माध्यमातून एकूण १ कोटी १० लाख ५५ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित करण्यात आले आहे. तर एकूण विमा संरक्षित रक्कम ही ५३ हजार ८८६ कोटी इतकी आहे. एकूण विमा हफ्ता सुमारे ७९५९ कोटी इतका निश्चित असून, त्यापैकी शेतकरी हिस्सा एक रुपया प्रमाणे १ कोटी ६५ लाख, राज्य हिस्सा एकूण ४७२५ कोटी, त्यामध्ये राज्य शासनाचा स्वतःचा हिस्सा ३२३२ कोटी व शेतकऱ्यांच्या वतीने राज्य शासनाने भरावयाचा हिस्सा १४९२ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे. केंद्र सरकारचा हिस्सा ३२३३ कोटी इतका निश्चित करण्यात आला आहे.

मागील वर्षीच्या खरीप हंगामामध्ये सुमारे १ कोटी ७१ लाख विमा अर्ज दाखल झाले होते. हंगामात वेगवेगळ्या प्रकारचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीकविमा पोटी आतापर्यंत ७२८० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्यापैकी ४२७१ कोटी पीकविम्याचे वाटप पूर्ण झाले आहे. आणखी ३००९ कोटी रुपयांचे वितरण सध्या सुरू आहे. अंतिम पीक कापणी अहवालाचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्यानंतर या रकमेत आणखी वाढ होणार असल्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

मागील वर्षी १.७० कोटी शेतकऱ्यांनी पीकविमा अर्ज केले होते. यंदा १.६५ कोटी शेतकऱ्यांनी अर्ज केले. मागील वर्षी बनावट अर्ज केलेल्या २,८९,६०७ अर्ज रद्द केले होते. त्यामुळे सरकारच्या २९७.८३ कोटी रुपयांची बचत झाली होती. बनावट अर्जदार शेतकरी, बनावट अर्ज भरणारे सामूहिक सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे यंदा बनावट अर्ज भरणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे.

# सप्तश्रृंग गड रस्त्यावरील खड्ड्यांमुळे भाविकांचे हाल

**नाशिक :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या कळवण तालुक्यातील सप्तशृंग गड या रस्त्यावर मोठे खड्डे झाले असून चालकांना वाहन चालवताना अक्षरशः कसरवणीपासून सप्तश्रृंग गडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर भाविकांच्या स्वागतासाठी मोठे खड्डे पडले आहेत. अंदाजे एक फुटाचे खड्डे झाले असल्यामुळे त्यात पावसाचे पाणी साचले असून या खड्ड्यांमध्ये दुचाकी आदळून तीन ते चार अपघात झाले आहेत. खड्ड्यात पाणी साचल्यामुळे खड्डा किती खोल, याचा अंदाज येत नाही. त्यामुळे चारचाकी वाहनेही या खड्ड्यात आदळत असून वाहनांचे नुकसान होत आहे. या रस्त्याला उतार असल्यामुळे तसेच परिसरात कायम धुके राहत असल्याने वाहन चालविणे कठीण होत आहे. एक खड्डा टाळायचा असेल तर दुसऱ्या खड्ड्यात वाहन जाते. त्यामुळे कोणत्यातरी खड्ड्यात वाहन जातेच. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष देण्यात येत नसल्याने अपघातांमध्येही वाढ झाली आहे.

याठिकाणी दोन ते तीन महिन्यापूर्वी रस्त्यावर खडी आणि कच टाकून थातूरमातूर दुरुस्तीचे नाटक करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी दुरुस्तीकडे हेतूपुरस्कर दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी वारंवार गडावर येत असतात. या रस्त्यानेच त्यांचे येणे- जाणे असते. तरीही रस्त्याच्या अवस्थेकडे त्यांच्याकडून लक्ष देण्यात येत नसल्याबद्दल भाविकांनी संताप व्यक्त केला.

# अटलसेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवास मंदगतीने

**पनवेल :** राज्य सरकारने १७ हजार ८०० कोटी रुपये खर्च करुन २१ किलोमीटर अंतराचा समुद्रावर अटलसेतू बांधला परंतू अटलसेतूवरुन मुंबई पूणे या मार्गिकेवर प्रवास करणाऱ्या ५० हजार वाहनांना सध्या पनवेलमधील कोळखे गाव ते कोन गावापर्यंत मंदगतीने प्रवास करावा लागत आहे. यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) कोळखे ते कोन या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर उन्नत मार्ग बांधणार असून यासाठी सूमारे एक हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. ही मार्गिका बांधकामासाठी ३० महिन्यांचा कालावधी लागणार असून कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया पुर्ण झाली असली तरी या मार्गिकेचे काम कंत्राटदाराने सुरु केलेले नाही. त्यामुळे अजून अडीच वर्षे अटलसेतू ते पुणे प्रवास करणाऱ्यांना पनवेलमध्ये कोंडीचा सामना करावा लागणार.



सध्या पनवेलमधील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ म्हणजे कोळखे गाव ते कोन गावापर्यंतचा मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक हैराण झाले आहेत. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावरुन पनवेलमध्ये येणारा मार्ग आणि द्रुतगती मार्गाला पनवेल शहराला जोडणाऱ्या मार्गावर दिवसाला सूमारे ५० हजार वाहने या मार्गावरुन धावतात. अटलसेतूवरुन मुंबईतून आलेली हलकी वाहने याच मार्गावरुन द्रुतगती मार्गाला जोडली जातात. रसायनी येथील औद्योगिक वसाहतीला व पुढे शेडूंग टोलनाक्याला जोडणारा हाच मार्ग असल्याने या मार्गावर वाहतूकीचा ताण वाढला आहे. पळस्पे फाट्यावरील कोळखे गावाजवळ बांधलेल्या पुलावर १२ मार्गिका आहेत. मात्र पळस्पे पुलावरुन या मार्गावर गाड्या उतरल्यानंतर तो मार्ग अवघ्या सहा मार्गिकांमध्ये बदल होत असल्याने येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी सदैव अनुभवायला मिळते.

राज्य सरकारने समुद्रावर १६.५ किलोमीटर अंतरावर आणि जमिनीवर ५.५ किलोमीटर अंतरावर अटलसेतू बांधला. मात्र या महामार्गाला जोडणाऱ्या अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर कोळखे ते कोन गावापर्यंत मार्गिका न बांधल्यामुळे वाहतूक कोंडीच्या मोठ्या समस्येला ५० हजार वाहनचालक दररोज तोंड देत आहेत. याबाबत एमएमआरडीएच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर या पल्यावर १ हजार रुपये खर्च करुन उन्नत मार्ग बांधणार असल्याचे सांगितले. संबंधित मार्ग बांधण्यासाठी कंत्राटदार नेमला आहे. मात्र कंत्राटदाराचा काम पुर्ण करण्याचा कालावधी ३० महिन्यांच्या असल्याचे या अधिकाऱ्याने सांगीतले.

तात्पुरत्या स्वरुपात कोंडी कशी कमी होईल. हा उन्नत मार्ग बांधण्यासाठी अजूनही ३० महिने लागतील. वाहनचालकांना कोंडीतून तात्पुरता दिलासा मिळण्यासाठी एमएमआरडीए व एमएसआरडीसीला पुढाकार घ्यावा लागेल. तात्पुरत्या स्वरुपात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील कोळखे ते कोन गावापर्यंत रस्ता सूमारे १५ फूट रुंद करणे गरजेचा आहे. या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. रस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता रुंदीकरण केल्यास काही महिने का होईना कोंडी कमी होईल. तसेच अवजड वाहने रस्त्यावर वळसा घेत असल्याने कोंडी होते. अवजड वाहनांना वळसा घेण्यासाठी या रस्त्यावर बंदी केल्यास काही प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होईल अशी वाहनचालकांची मागणी आहे. पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरिक्षक संजय पाटील यांनी कोंडी कमी होण्यासाठी उपाययोजना एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना सुचविल्या आहेत. मात्र अजूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली नाही.

# पँगॉन्ग लेकवरील चीनचा पूल तयार; भारतासाठी हा किती मोठा धोका?

**दिवसेंदिवस सीमारेषेवर चीनच्या कारवायांमध्ये वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. आता चीनने पँगॉन्ग लेकवर पूल तयार केला आहे, जो आता वाहतुकीसाठी सुरू झाल्याची माहिती आहे. बीजिंगच्या या कारवाईचे भारताच्या सुरक्षेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. सॅटेलाइटच्या सहाय्याने घेण्यात आलेल्या फोटोमध्ये हा पूल स्पष्टपणे दिसून येत आहे. या पुलाद्वारे चीनला ताबारेषेपर्यंत एक सोयीस्कर मार्ग मिळाला आहे. लडाखमधील खुर्नाक भागात पँगॉन्ग लेकच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांना जोडणारा हा ४०० मीटरचा पूल असून, या पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्याचे छायाचित्रात दिसून येत आहे. हा पूल तयार करण्यामागील कारण काय? ही भारतासाठी धोक्याची घंटा आहे का? याविषयी सविस्तर जाणून घेऊ.**

पँगॉन्ग लेकवर चीनचा पूल

विविध वृत्तवाहिन्यांवर प्रसारित करण्यात आलेल्या सॅटेलाइट इमेजवरून असे दिसून आले आहे की, चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए)ने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या ४०० मीटर पुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे. एनडीटीव्हीने वृत्त दिले की, काही छायाचित्रांमध्ये नव्याने बांधलेल्या पुलावरून वाहने जात असल्याचे दिसून आले आहे. २०२२ मध्ये तलावाचा सर्वात अरुंद भाग असलेल्या खुर्नाक येथील पँगॉन्ग त्सोवर चीन हा पूल बांधत असल्याचे वृत्त समोर आले होते. सॅटेलाइट इमेजरीतज्ज्ञ डेमियन सायमन यांनी तेव्हा एक्सवर सांगितले होते की, पँगॉन्ग लेकच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांना जोडणारा पूल लवकरच वापरासाठी तयार होईल. त्यानंतर भारतीय लष्कराच्या एका निवृत्त जनरलनेही सीएनबीसीला याची

चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी (पीएलए)ने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या ४०० मीटर पुलाचे बांधकाम पूर्ण केले आहे.



जेव्हा पत्रकारांनी या पुलाबद्दल सरकारला प्रश्न विचारला होता, तेव्हा परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची म्हणाले होते, आम्ही पँगॉन्ग लेकवर चीनने पूर्वीच्या पुलाच्या बाजूला पूल बांधल्याचे वृत्त पाहिले आहे. हे दोन्ही पूल १९६० च्या दशकापासून चीनच्या बेकायदा ताब्याखाली असलेल्या भागात आहेत. ते म्हणाले, आम्ही आमच्या भूभागावर असा बेकायदा कब्जा कधीच स्वीकारणार नाही किंवा आम्ही चीनच्या या बांधकाम उपक्रमांनाही स्वीकारणार नाही. हा पूल सरोवराच्या दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील किनाऱ्यांमधील सुमारे १३० किलोमीटर अंतर कमी करतो. द प्रिंटने दिलेल्या वृत्तानुसार, पुलामुळे तिबेटमधील रुतोग काऊंटीमधून खुर्नाक ते दक्षिण किनाऱ्यापर्यंतचा १८० किलोमीटरचा प्रवास कमी होतो. एनडीटीव्हीने डेमियन सायमन यांच्या पोस्टचा उल्लेख करत सांगितले की, पँगॉन्ग लेकवरील नवीन पुलामुळे चिनी सैन्याला जलद सैन्य तैनातीसाठी सोपा आणि सोयिस्कर मार्ग मिळतो. पूर्वी, पीएलएला या झोनपर्यंत पोहोचण्यासाठी तलावाच्या संपूर्ण पूर्वेकडील भागातून फिरून यावे लागायचे.

**ही भारतासाठी धोक्याची घंटा आहे का?**

पँगॉन्ग त्सो जवळील पुलाचे स्थान भारतासाठी चिंतेचे आहे, कारण लडाखकडे चीन नजर लावून बसला असल्याचे या कृतीतून स्पष्ट होते. भारतीय लष्कराच्या नॉर्दर्न कमांडच्या फायर अँड फ्युरी कॉर्प्समध्ये सेवा बजावलेले जनरल रोहित गुप्ता (निवृत्त) यांनी ङ्गसीएनबीसीफ्ला सांगितले की, उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यादरम्यान सैन्याला वेगाने हलवण्याची चीनची क्षमता या पुलामुळे वाढते. पूर्वी पँगॉन्ग त्सो लेकवर चीनसाठी हे अशक्य होते. संरक्षण तज्ज्ञांनी नमूद केले आहे की, बांधण्यात आलेल्या पुलामुळे चीनला पर्वतांमध्ये त्वरीत ऑपरेशन सुरू करण्यासाठी लागणारा वेळ कमी होण्यास मदत होईल. शिवाय पुलामुळे चिनी सैन्याला त्यांच्या रणगाड्यांसह दक्षिणेकडील रेझांग लासारख्या भागात प्रवेश करण्यास मदत मिळेल. या भागात २०२० मध्ये भारतीयांनी त्यांना पराभूत केले होते.

पुलाच्या महत्त्वावर बोलताना, लडाख प्रदेशात मोठ्या प्रमाणावर सेवा देणारे विमानवाहक एअर व्हाइस मार्शल (निवृत्त) मनमोहन बहादूर यांनी हिंदुस्तान टाईम्सला सांगितले, चिनी सैन्याला या पुलामुळे प्रतिकारशक्ती राखण्यासाठी खूप मदत मिळेल. गेल्या अनेक वर्षांपासून या भागात चीनच्या कारवाया सुरू आहेत. चीन सातत्याने या भागात आपल्या पायाभूत सुविधांचा विकास करत आहे आणि एलएसीच्या आजूबाजूच्या विविध भागांवर दावा करत आहे. २०२० च्या गलवान चकमकीत २० भारतीय सैनिकांचा मृत्यू झाल्यापासून, चीनने लडाखपासून अरुणाचल प्रदेशापर्यंत पसरलेल्या ३,४८८ किलोमीटर एलएसीच्या तीनही क्षेत्रांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे.

एप्रिलमध्ये पत्रकार रजत पंडित यांनी दिलेल्या माहितीत असे दिसून आले आहे की, चीन एलएसीवर आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी झिओकांग गावे आणि इतर सीमांवरील पायाभूत सुविधांचा वापर करत आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, बीजिंगने सॅमझुंगलिंगच्या उत्तरेकडून गलवान व्हॅलीपर्यंत रस्त्याचे बांधकाम पूर्ण केले; ज्यामुळे पीएलएला या भागात वेगाने सैन्य तैनात करण्यासाठी १५ किलोमीटर कमी अंतर मोजावे लागणार आहे. पीएलए एलएसीच्या इतर भागांमध्ये बोगदे, हेलिपॅड, पूल आणि बंकरदेखील बांधत आहे. शिवाय, चीनने या प्रदेशात अतिरिक्त लढाऊ विमाने, बॉम्बर आणि इतर काही विमाने तैनात केली आहेत.

**यावर भारताची प्रतिक्रिया काय?**

भारताने अद्याप नवीन सॅटेलाइट छायाचित्रांवर आपली अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. परंतु, हिंदुस्तान टाईम्सच्या सूत्रांनी दिलेल्या महितीनुसार, भारताने पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी आणि चीनच्या अनधिकृत करवायांवर अनेक पावले उचलली आहेत. दरम्यान, सॅटेलाइट छायाचित्रांवर प्रतिक्रिया देताना, काँग्रेस खासदार मनीष तिवारी एक्स वर म्हणाले, चीनने पँगॉन्ग सरोवराच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांना जोडणारा पूल बांधला आहे. भारतासाठी याचे गंभीर धोरणात्मक परिणाम होऊ शकतात. कारण, या पुलामुळे चीनला सरोवराच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यावर त्वरीत सैन्य हलवणे सोयीस्कर होणार आहे. या पुलामुळे पँगॉन्ग लेक क्षेत्रातील चीनचे वर्चस्व वाढले आहे.

काँग्रेसचे प्रमुख मल्लिकार्जुन खरगे यांनीही या पुलाच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सरकारची कामगिरी निराशाजनक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी एक्सवर लिहिले की, चीनने पँगॉन्ग लेकच्या उत्तर आणि दक्षिण किनाऱ्यांना जोडणारा पूल बांधला आणि तो पूल आता कार्यरत झाला आहे, याचा प्रभाव आपल्या धोरणात्मक वर्चस्वावर पडेल. या पुलामुळे चीनला वेगाने लष्करी हालचाली करता येणे शक्य होणार आहे, त्यामुळे हा एक चिंतेचा विषय मानला जात आहे.

# ऑस्ट्रेलियाचा रडीचा डाव! तरी भारत जिंकलाच, १९७२ नंतर पहिल्यांदाच विजय मिळवला

पॅरिस: गुरुवारी भारताच्या हॉकी संघाचा विजयरथ रोखण्यात बेल्जियमला यश आले होते. बेल्जियमने टीम इंडियाचा १-२ असा पराभव केला. बेल्जियम विजयासह अव्वल स्थानी गेला तर भारत दुसऱ्या स्थानावर राहिला. भारताने न्यूझीलंड आणि आयर्लंडचा पराभव केला आहे. तर अर्जेंटिनाविरूद्धचा सामना अनिर्णित संपला. आज शुक्रवारी टीम इंडियासमोर बलाढ्य ऑस्ट्रेलियाचे आव्हान होते. सामन्याच्या सुरुवातीपासून दोन्हीही संघांनी आक्रमक खेळ करण्याचा प्रयत्न केला. कांगारूंच्या सततच्या आक्रमक खेळापुढे भारताच्या बचाव विभागाने चांगली कामगिरी केली. पहिल्या क्वार्टरच्या आठव्या मिनिटाला ऑस्ट्रेलियन खेळाडूने खुल्या मैदानाचा फायदा घेत भारतीय चाहत्यांची धाकधूक वाढवली. पण, तितक्यात भारताचा जर्मन धावून आला अन्सुखद धक्का बसला. ११व्या मिनिटाला ऑस्ट्रेलियालापेनल्टी कॉर्नरच्या रूपात गोल करण्याची संधी मिळाली. पण चेंडू वाइड केल्याने धोका टळला. मात्र, त्याच्या पुढच्याच मिनिटाला भारताने एक गोल करून खाते उघडले.

ललितने ऑस्ट्रेलियन खेळाडूंना चकमा देत शानदार गोल केला. पहिल्या क्वार्टरला तीन मिनिटे शिल्लक असताना पेनल्टी कॉर्नरचा फायदा घेत भारतीय कर्णधार हमनप्रीत सिंगने गोल केला. यासह भारताने पहिल्या




क्वार्टरमध्ये २-० अशी मजबूत आघाडी घेतली. दुसऱ्या क्वार्टरच्या चौथ्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाला दुसरा पेनल्टी कॉर्नर मिळाला. पण भारताचा बचाव विभाग पुन्हा एकदा कांगारूंना वरचढ ठरला. चौथ्यांदा ऑलिम्पिक खेळत असलेलाभारताचा गोलरक्षक श्रीजेशने गोल रोखण्यात यश मिळवले. अखेर ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या क्वार्टरच्या नवव्या मिनिटाला गोल करता आला.

या घडीला भारताकडे २-१ अशी आघाडी होती. पहिल्या हाफच्या अखेरपर्यंत ही आघाडी कायम राहिली.तिसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीला दोन्हीही संघातील शिलेदार आक्रमक दिसले. खरे तर १९७२ च्या ऑलिम्पिकमध्ये शेवटच्या वेळी भारताने ऑस्ट्रेलियाचा ऑलिम्पिकमध्ये पराभव केला होता. तेव्हापासून ऑस्ट्रेलियन संघ या मोठ्या व्यासपीठावर नेहमीच वरचढ ठरत आला होता. तिसऱ्या क्वार्टरच्या चौथ्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला पण गोलची संधी हुकली. पण, पुन्हा एकदा ऑस्ट्रेलियन खेळाडूच्या पायाला चेंडू लागल्याने पेनल्टी कॉर्नर मिळाला. भारताला यावेळी रिव्ह्यूची मदत झाली. मिळालेल्या संधीचे सोने करून कर्णधार हरमनप्रीत सिंगने सहज गोल करून ३-१ अशी आघाडी घेतली.

या क्वार्टरमधील अखेरच्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाला पेनल्टी कॉर्नर मिळाला पण त्यांना गोल करता आला नाही. अखेर हा क्वार्टर ३-१ अशा स्कोअरमध्ये संपला.चौथा अर्थात अखेरचा क्वार्टरचा इतिहास लिहिणारा होता. या क्वार्टरमध्ये २ गोलची आघाडी कायम ठेवून विजय मिळवण्याचे आव्हान भारतासमोर होते. चौथ्या क्वार्टरमधील १५ मिनिटांकडे तमाम भारतीयांचे लक्ष लागले होते.

या क्वार्टरच्या सहाव्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला पण ऑस्ट्रेलियाच्या गोलरक्षकाने चांगला बचाव केला. आठव्या मिनिटाला देखील भारताला गोल करण्याची संधी मिळाली. अभिषेकने गोल केला खरा पण कांगारूंना पंचांनी वाचवले अन् हा गोल अमान्य ठरवण्यात आला.अखेरच्या काही मिनिटांमध्ये ऑस्ट्रेलियाने गोल करून ३-२ असा स्कोअर केला.

पण, भारताने ऐतिहासिक विजय नोंदवून १९७२ नंतर +प्रथमच ऑस्ट्रेलियाचा ऑलिम्पिकमध्ये पराभव केला. विशेष बाब म्हणजे भारताला विजयी घोषित केल्यानंतरही ऑस्ट्रेलियन खेळाडू मैदानातच थांबले. सामन्याच्या अखेरीस भारतीय खेळाडूच्या पायाला चेंडू लागल्याचे सांगत ते पेनल्टी कॉर्नरची मागणी करताना दिसले. मात्र, पंचांनी निर्णय देत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

भारतासाठी गोल करणारे शिलेदार
अभिषेक (पहिला)
हरमनप्रीत सिंग (दुसरा)
हरमनप्रीत सिंग (तिसरा)

## फिल्मी दूनिया

# चित्रपट चालण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक? अशोक सराफ

मराठी चित्रपटसृष्टीत असे अनेक कलाकार आहेत, ज्यांच्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीला वेगळे स्थान प्राप्त झाले. ज्यांच्यामुळे अभिनयाची एक वेगळी उंची गाठली गेली, अशा अभिनेत्यांपैकी एक म्हणजे अशोक सराफ आहे. ज्यांना संपूर्ण महाराष्ट्र अशोक मामा म्हणून ओळखतो, ते लाईफ लाईन या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. आता या निमित्ताने दिलेल्या मुलाखतीत त्यांनी जुने चित्रपट आणि नवे चित्रपट यांच्याबाबत आपले मत व्यक्त केले आहे.

काय म्हणाले अशोक सराफ?

अभिनेते अशोक सराफ यांनी प्लॅनेट मराठीला नुकतीच मुलाखत दिली. यावेळी त्यांना त्यांच्या करिअरच्या सुरुवातीचे चित्रपट आणि आताचे चित्रपट यामध्ये काय बदल झालेला जाणवतो? असा प्रश्न विचारला. याला उत्तर देताना अशोक सराफ यांनी सांगितले, मी जेव्हा चित्रपटात काम करायला सुरुवात केली आणि आताचे जे चित्रपट आहेत, यामध्ये अमूलाग्र बदल झाले आहेत. त्यावेळी माणसांचं काम जास्त असायचं, आता मशीनचं काम जास्त आहे. त्यावेळी एडिटिंग करायचं असेल तर फीत कात्रीने कापायला लागायची, मग ती खरडायला लागायची, त्यानंतर सोल्यूशन लावून चिटकवायला लागायची, असं त्यावेळी एडिटिंग व्हायचं. आता त्यामध्ये मोठे बदल झाले आहेत. त्यावेळी फार कष्ट होते. कष्ट करण्याशिवाय पर्याय नव्हता. फार बदल हे टेक्निकल गोष्टींमध्ये झाले.

कॅमेरे लेन्सेस जास्त आल्यामुळे शॉट घेण्याचे प्रकार वाढले. जुन्या चित्रपटांमध्ये साधं टेक्निक होतं, पण ते लोकांना आवडायचं. कारण कथेमध्ये जोर असायचा. कथानक इतक्या ताकदीचे असायचे की लोक त्यामध्ये गुंतून जायचे. लोकांना तुम्ही कोणता अँगल घेतला आहे, त्याने फरक पडत नाही; तर चित्रपटात काय घडतं याने फरक पडतो. ते आवडलं तर चित्रपट चालतो. त्यावेळच्या चित्रपटांचे रौप्य महोत्सव साजरे व्हायचे, आता चार आठवडे चित्रपट टिकणे कठीण झाले आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

अभिनय क्षेत्रात येणाऱ्या नवीन कलाकारांना तुम्ही काय सल्ला द्याल, याला उत्तर देताना अशोक सराफ यांनी म्हटले आहे की, मी सांगावं असं काही नाही आणि मी सांगेन ते पुढचे लोक ऐकतील असेही नाही. कारण जो माणूस या क्षेत्रात येतो, त्याला स्वत:ची पद्धत असते, धारणा असते. आपण करत असलेल्या कामाबद्दल कल्पना असते. काम करताना प्रत्येक व्यक्तीने आपण करत असलेल्या कामाबद्दल विचार केला पाहिजे. एका चित्रपटानंतर हे जमणार नाही, मात्र थोडंफार काम केल्यानंतर याचा अभ्यास केला पाहिजे. कॅमेरा अशी गोष्ट आहे, जी कुठे ठेवल्यावर तुम्ही कसे दिसणार आहात याचा अंदाज तुम्हाला आला पाहिजे. हे लक्षपूर्वक काम करण्यातून येतं, असं त्यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, लाईफ लाईन हा चित्रपट २ ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल झाला असून अशोक सराफ एका वेगळ्या भूमिकेत दिसत आहेत. ट्रेलरमध्ये त्यांनी निभावलेली सर्जनची भूमिका अत्यंत गंभीर असलेली पाहायला मिळत आहे. हा चित्रपट साहिल शिरवईकर यांनी दिग्दर्शित केला असून माधव अभ्यंकर हे किरवंताच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत.



# खेल खेल में चा ट्रेलर प्रदर्शित

खिलाडी म्हणून ओळखला जाणारा अभिनेता म्हणजे अक्षय कुमार होय. तो नेहमीच वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो. मात्र, कधीच तो एकाच प्रकारच्या भूमिकेत दिसत नाही. त्याची भूमिका ही नेहमीच दुसऱ्या भूमिकेपेक्षा वेगळी असते. आता तो खेल खेल मेंफ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

खेल खेल में या चित्रपटाच्या ट्रेलरच्या सुरुवातीला सात मित्र-मैत्रिणी आपल्या नवरा किंवा बायकोसोबत एकत्र बसलेले दिसत आहेत. त्यावेळी त्यांच्यापैकी एकजण इथे आपण मित्र आहोत किंवा नवरा बायको आहोत, पण कोणाच्या मोबाइलमध्ये काय आहे, हे कोणाला माहीत आहे? असे म्हणत आहे. हे मित्र-मैत्रिणी इतर कोणता खेळ खेळण्यापेक्षा ते नवीन खेळ खेळण्याचे ठरवतात. त्यासाठी ते नियम बनवतात. रात्र संपेपर्यंत आपले फोन हे सार्वजनिक मालमत्ता आहे, सगळ्यांनी आपापले मोबाइल सगळ्यांसमोर अनलॉक करून टेबलावर ठेवायचे आणि कोणाच्या मोबाइलवर फोन किंवा मेसेज आला तर तो मोठ्याने सगळ्यांसमोर वाचायचा. थोडक्यात, कोणाच्या मोबाइलमध्ये काय रहस्य आहे हे सगळ्यांसमोर उघड करायचे, असा हा खेळ आहे. आता या खेळामुळे जमलेल्यांपैकी अनेकांची रहस्ये उघड होताना दिसत असून त्यापुढे नक्की काय होणार, हे चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर समजणार आहे. मात्र, या कॉमेडी ट्रेलरने चित्रपटाबद्दलची प्रेक्षकांची उत्सुकता वाढलेली दिसत आहे.

काही दिवसांपूर्वीच अक्षय कुमारने सोशल मीडियावर खेल खेल मेंफ या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित केले होते. प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये त्यांची दोन रुपे दिसत आहेत. एका बाजूला सगळ्यांचे हसरे चेहरे दिसत असून दुसऱ्या भागात सगळ्यांनी तोंडावर बोट ठेवल्याचे दिसत असून त्यांच्याकडे काहीतरी रहस्य लपवलेले आहे असे दिसत आहे. आता हे रहस्य त्यांच्या मोबाइलमधील आहे, असे समोर आलेल्या ट्रेलरमधून दिसत आहे.

दरम्यान, अक्षय कुमार हा नुकताच सरफिराफ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. मात्र, त्याचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालू शकला नाही. त्याचे चित्रपट सतत फ्लॉप होत असल्याने नेटकरी अनेकदा त्याला चित्रपटाचे कथानक बघून मोजकेच चित्रपट करण्याचा सल्ला देताना दिसतात. याबरोबरच, त्याच्याबरोबर काम करणाऱ्या अभिनेत्रींचे वय त्याच्यापेक्षा अत्यंत कमी असल्यानेदेखील त्याच्यावर मोठी टीका होताना दिसते. मात्र, खिलाडी कुमार या टीकांकडे दुर्लक्ष करत सतत नवीन चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो.

खेल खेल में या चित्रपटात अक्षय कुमारबरोबर वाणी कपूर, फरदीन खान, एमी विर्क आणि तापसी पन्नू, मधुमालती कपूर, अपारशक्ती खुराना, जॉनी लिवर हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. आता हा चित्रपट प्रेक्षकांना चित्रपटगृहाकडे खेचून आणण्यात यशस्वी होणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# स्वप्निल जोशीची सर्वात आवडती गोष्ट

अभिनेता स्वप्निल जोशी हा सतत चर्चेत राहणारा अभिनेता आहे. तो नुकताच बाई गं या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. या चित्रपटात साकारलेल्या विविध भूमिकांची मोठी चर्चा रंगलेली दिसली होती. आता त्याने एका मुलाखतीदरम्यान, मी जेव्हा काम करतो त्यावेळी माझ्या कॉन्ट्रॅक्टमध्ये एक गोष्ट अनिवार्य असते, असे सांगितले आहे.

काय म्हणाला स्वप्निल जोशी?

स्वप्निल जोशीने व्हायफळ या यूट्यूब पॉडकास्टला नुकतीच मुलाखत दिली, त्यावेळी त्याने अनेक गोष्टींबद्दल खुलासा केला आहे. त्याने त्याच्या आयुष्यातील अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. सकाळी लवकर उठायला आवडते की नाही? या प्रश्नाला उत्तर देताना अभिनेत्याने म्हटले आहे, स्वाभाविकपणे मला लवकर उठायला आवडत नाही. मला जर कोणी झोपेतून उठवलं नाही, तर मी उठणारच नाही, असं माझी आई म्हणते.

तीन दिवस मी सलग झोपतो. उठतो, जेवतो मग परत झोपतो. कारण माझी चिरंतन झोप अपूर्ण आहे. गेल्या अनेक वर्षांची झोप अपूर्ण आहे. कारण मी वयाच्या नवव्या वर्षी काम करायला सुरुवात केलीय, माझी अनेक वर्षांची झोप अपूर्ण आहे आणि मला झोप अत्यंत प्रिय आहे. एखाद्या गोष्टीला सामोरं जाण्यासाठी मला झोप मदत करते. मला कोणत्या गोष्टीचा तणाव असेल, दबाव असेल, काम नसेल, खूप काम केलं, पैसे खूप आले किंवा पैसे नसले तरी मी झोपतो.

पुढे बोलताना स्वप्निल म्हणतो, देवाची कृपा आहे, मी माझ्या आयुष्यात करिअरच्या अशा ठिकाणी आहे, जिथे मी काम करतो तिथे कॉन्ट्रॅक्टमध्ये लिहिलेलं असतं की, जेवणाच्या सुट्टीनंतर एक तास अनिवार्य झोपेसाठी सुट्टी असते, हे लिखित असतं. लोकांचा लंच ब्रेक एक तासाचा, माझा दोन तासांचा असतो. जेवल्यानंतर मी एक तास काम करत नाही. झोपेचे महत्त्व सांगताना अभिनेत्याने म्हटले आहे की, एक तास कोणी झोपत नाही, पण २०-२५ मिनिटांची जी डुलकी असते, त्यामुळे पुढचे आठ तास काम करण्यासाठी तुम्ही तयार होत असता. मी जर चुकत नसेन तर जपानमध्ये मुलांना २० मिनिटांच्या सुट्टीमध्ये झोपायला देतात.



अभिनेत्याने पुढे म्हटले आहे की, मला देवाच्या कृपेने झोप लागते. मला वाटतं, जर तुम्हाला भूक लागत असेल, खाल्लेल्या अन्नाचे पचन होत असेल आणि तुम्हाला झोप लागत असेल, यासारखी मोठी गोष्ट नाही.

तुमच्याकडे करोडो-अब्जो रुपये असतील, पण भूक लागत नसेल, खाल्लेल्या अन्नाचं पचन होत नसेल आणि तुम्हाला झोप येत नसेल तर इतके पैसे असून त्याचा काय उपयोग आहे. त्यामुळे तीन गोष्टी व्यवस्थित असतील तर देवाचा तुमच्यावर आशीर्वाद आहे.

दरम्यान, स्वप्निल जोशी लवकरच नवरा माझा नवसाचा २ या बहुप्रतिक्षित चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची मोठी चर्चा होताना दिसत आहे. अत्यंत लोकप्रिय चित्रपटांपैकी एक असलेला नवरा माझा नवसाचा या चित्रपटाचा हा सिक्वेल आहे.